
म. ग्रं. सं. ठाणे.
...षय काव्य
क्र. २५८२



# शूर मर्दाचा पोवाडा

वसंत बापट

REFBK-0025735
REFBK-0025735

संदर्भ काव्य

२५८२
२५७३५
२२।७।८८

ग्रंथालय ठाणे
२५८२
२५७३५
काव्य २२।७।८८
शाखा (स्थळ प्रत)

काव्य

वसंत बापट विरचित शाहिरी कवने आणि पोवाडे

# शूर मर्दाचा पोवाडा

REFBK-0025735
REFBK-0025735

साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

शूर मर्दाचा पोवाडा : © वसंत बापट : ९ ऑगस्ट १९८८
प्रकाशक : ग.प्र. प्रधान : साधना प्रकाशन : ४३१ शनिवार पेठ, पुणे ३०
मुद्रक : बालोद्यान छापखाना, पुणे : अक्षरयोजना : अक्षर संचय, पुणे
मुखपृष्ठ : सुभाष अवचट किंमत रु. ३५/-

स्वातंत्र्यासाठी
जे आनंदाने आणि अभिमानाने मरणाला सामोरे गेले
त्या वीरांच्या प्रेरक स्मृतीस सादर समर्पण

## पुरस्कार

एस्.एम्. जोशी

वीरांच्या कथा कवींनी मुक्तकंठाने गाव्या ही फार जुनी परंपरा आहे. भारतात ती सर्वत्र आढळते. वीरगाथांना महाराष्ट्रात आपण पोवाडे म्हणतो. डफावरची थाप आणि तुणतुण्याची साथ हे या मराठी लोककलेचे वैशिष्ट्य आहे. मराठशाहीत पोवाड्याला रूप आले. पोवाड्यांचा विकास झाला. पुढे स्वातंत्र्याच्या आंदोलनात या शाहिरी कलेला कालानुरूप नवे रूप मिळाले. परंतु याही काळात पोवाडे मुख्यतः गायले गेले ते इतिहासकालीन वीरांचेच.

माझे मित्र वसंत बापट यांची गोष्ट वेगळी आहे. त्यांनीही परंपरेला अनुसरून छत्रपती शिवाजी महाराज या महाराष्ट्राच्या कुलदैवताचा पोवाडा रचलेला आहे; परंतु त्यांची शाहिरी या शतकातील घटना आणि हौतात्म्य यांचे चित्रण करण्याने कृतार्थ झाली आहे. महात्मा गांधींच्या जीवनावर त्यांनी विस्तृत पोवाडा लिहिलेला आहे. लोकमान्य टिळक, सरहद्द गांधी असे राष्ट्रपुरुष आणि ४२ च्या आंदोलनात ज्यांना वीरमरण आले असे हुतात्मे हे देखील त्यांच्या पोवाड्यांचे विषय आहेत. ही कलाच लोकजीवनाशी समांतर असल्यामुळे संयुक्त महाराष्ट्राचा लढा किंवा गोव्याचा स्वातंत्र्यसंग्राम त्यांनी पोवाड्यातून नाट्यमय रीतीने वर्णन करावा हे ओघानेच आले. वीर सावरकर आणि ग.दि. माडगूळकर यांनी हा अस्सल मराठी लोककलेचा प्रकार हाताळला होता आणि त्याबद्दल त्यांची महाराष्ट्रात ख्यातीही आहे. परंतु आधुनिक मराठी कवींमध्ये विपुल आणि गुणसंपन्न पोवाडे वसंत बापट यांनीच रचलेले आहेत, अशी माझी

समजूत आहे. अर्थात हा त्यांच्या काव्यकर्तृत्वाचा केवळ एक पैलू आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

हे पोवाडे अनेक ठिकाणी गायले गेले आहेत. काही आकाशवाणीवरून लोकांनी ऐकलेले आहेत. काही पोवाड्यांच्या ध्वनिमुद्रिकाही निघाल्या आहेत. याचे श्रेय मुख्यतः या पोवाड्यांचे गायक शाहीर लीलाधर हेगडे यांना दिले पाहिजे. अशा शाहिरी कवनांचा प्रसार यापुढेही अवश्य करता येईल. मात्र त्यासाठी तरुण आणि तडफदार गायकांनी ध्येयवादाने प्रेरित होऊन महाराष्ट्रभर आपला बुलंद आवाज घुमवत ठेवला पाहिजे. लोकरंजनातून लोकशिक्षण करण्याची आजही नितांत आवश्यकता आहे. आज धर्मवेड आणि जातीयता यांना ऊत येत चालला आहे. अशा काळात गांधीजींचे चरित्र तर ऐकवले पाहिजेच पण त्याबरोबर काश्मीरमधील हुतात्मा मकबूल शेरवाणी याची वीरकथाही जनसामान्यापर्यंत पोचविली पाहिजे.

साधना प्रकाशनाने हे अगदी वेगळे पुस्तक आवर्जून प्रसिद्ध केले आहे, त्याचे मर्म सर्व सहृदय देशप्रेमी आणि समाजहितैषी ध्यानी घेतील असा मला विश्वास वाटतो.

पुणे,
९ ऑगस्ट १९८८.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# भूमिका

युद्धात धारातीर्थी पडणाऱ्या सैनिक बांधवांविषयी प्रत्येक राष्ट्रात नितांत आदर असतो. काळजाचा एक कोपराच त्यांच्या स्मरणासाठी राखून ठेवलेला असतो. एकीकडे त्यांच्या आठवर्णींनी पापणीचे काठ ओलावत असतात तर दुसरीकडे त्यांच्या मर्दुमकीचाआणि अतुलनीय धैर्याचा अभिमान नसानसात तटतटेला असतो.धारातीर्थी पडलेला माणूस सामान्य शिपाई असो की अनेक अक्षौहिणी दळे इशाऱ्यासरशी रणांगणाच्या पटावर हलवणारा सेनानी असो, त्याचे नाव राष्ट्राच्या लेखी एकच असते — सैनिक. त्यामुळे आपल्या राष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाचा पाया घालण्यासाठी ज्यांनी आपल्या आयुष्याचा चिखलगारा केलेला असतो त्यांचे स्मारक उभारताना त्यांच्या नावाची दीर्घ यादी कोरण्यापेक्षा अज्ञात सैनिकांच्या स्मृतीसाठी कीर्तिस्तंभ निर्माण केला जातो. हा 'अन्नोन सोल्जर' अमूक एक कोणी नसतोच. तो असतो ज्वलंत पण अमूर्त त्यागाची मूर्ती. त्या स्मारकापाशी नतमस्तक होणारा प्रत्येक माणूस आठवत असतो समरांगणावर पडलेल्यांचे धीरोदात्त बलिदान. जे वेदीवर बळी गेलेले असतात त्यांचीही अपेक्षा वेगळी नसतेच. 'दिन खून के हमारे प्यारों न भूल जाना' या आवाहनाखाली कोणाच्याच सह्या नसतात. म्हणून पुढील पिढ्यांनी कोणाचे नाव लक्षात ठेवले नाही तर एकवेळ चालेल; त्यांनी लक्षात ठेवायला हवी ती अंतिम त्यागाची पूर्वजांनी दाखवलेली तयारी. कृतज्ञता हा सुसंस्कृत माणसाचा श्रेष्ठ गुण आहे. तो न जाणवण्याइतका दुर्मिळ होता कामा नये. ज्या राष्ट्रातले लोक आपल्या शौर्य-धैर्याच्या कहाण्या विसरतात, वीरगाथांची संभावना जुनाट पुराणकथा म्हणून करतात, प्रसंगी बलिदानाची देखील टवाळी करतात त्या राष्ट्राचे भवितव्य अंधकारमय असले तर त्यात काही नवल नाही. महानिर्वाणांची खिल्ली उडवून क्षणैक मनोरंजन करता येईल आणि पिटातल्या प्रेक्षकांकडून हशा आणि टाळ्या वसूल करता येतील; पण असल्या तुच्छतावादाचा प्रत्येक राष्ट्रप्रेमी मनाला तिरस्कारच वाटेल.

आंधळी प्राचीनपूजा ही वांझोटी असते आणि आपला नाकर्तेपणा लपवण्यासाठी

माणसे तिचा आडोसा घेतात. पण याचा अर्थ असा नाही की आपल्या इतिहासातील उज्ज्वल प्रसंगांचा आणि उदात्त नायकांचा आपल्याला विसर पडावा. आपल्या स्वातंत्र्य संग्रामात रोमांचकारक घटना घडल्या आणि शौर्य-धैर्याचे, त्यागाचे, पराक्रमाचे अलौकिक दर्शन आपल्याला झाले. भारतीय हुतात्म्यांनी आपल्या रक्ताने लिहिलेला इतिहास हाच वर्तमानकाळाचा स्फुरणदायी उपोद्घात आहे. भविष्यातही आपल्याला वाट दाखवण्यासाठी त्याचा प्रकाश लाभू शकेल. भविष्यातील स्वातंत्र्यवीरही असिधाराव्रत घेताना स्वातंत्र्यवीर सावरकरांप्रमाणे ग्वाही देतील :

की घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने
लब्धप्रकाश-इतिहास-निसर्गमाने
जे दिव्य दाहक म्हणूनि असावयाचे
बुद्ध्याचि वाण धरिले करि हे सतीचे

देशाच्या उज्ज्वल 'उद्या' साठी ज्यांनी निःस्वार्थपणे आपला 'आज' खुडून टाकला त्या हुतात्म्यांच्या शौर्याची आणि त्यागाची पूजा कृतज्ञ देशाने केलीच पाहिजे.

शाहिरांची प्रेरणाही मुख्यतः हीच असते. वीरांचे विस्मरण होऊ नये ही प्रत्येक शाहिराची मनीषा असते. या असोशीमुळेच शूर मर्दांचे पवाडे रचले जातात, गायले जातात आणि शाहिरांच्या मशालीवर आपापल्या मनाच्या मशाली पेटवूनच प्रत्येक श्रोता थरारून जातो. हा काही वैचारिक सिद्धांत नाही किंवा मनातली इच्छा पुरवण्यासाठी केलेले स्वप्नरंजन नाही. ही अनुभवाची गोष्टआहे. महाराष्ट्राला तरी वीरगाथा कित्येक शतके माहीत आहेत. 'ज्यांचे पाठारे पाहिले त्यांचे पुढारी कोणी पाहिलेच नाहीत. (समरांगणाकडे जाताना त्यांना पाहिले, तेथून परतताना पाहिलेच नाही.)' या महिकावतीच्या बखरीतल्या उद्गाराचा अर्थ तरी हाच आहे. ज्ञानेश्वरांनी अर्जुनाच्या पराक्रमाचे वर्णन करताना कृष्णाच्या मुखी उद्गार घातला आहे- 'पवाडा तुवां केला, गंधर्वासी !' छत्रपती शिवाजी राजाच्या अतुल पराक्रमाचा पवाडा अगीनदासाने आपल्यासाठीच रचून ठेवला आहे. 'शिवरायाचेआठवावे रूप, शिवरायाचा आठवावा प्रताप' म्हणणाऱ्या समर्थ रामदासांच्या प्रत्ययकारी काव्याइतकेच महत्त्व अगीनदासाच्या पवाड्यालाही आहे. सिंहगड जिंकताना तानाजीने केलेला पराक्रम आणि त्याला आलेले वीरमरण यांचे तुळशीदास शाहिराने काढलेले चित्र पुसून गेले नाही हेच सावरकरांनी पुन्हा विसाव्या शतकात 'धन्य शिवाजी तो रणगाजी, धन्यचि तानाजी' असा जो पोवाडा लिहिला आहे त्यावरून स्पष्ट होते. लोकांचा लोककल्याण राजा श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी ह्या तर निदान तीन शतके शाहिरांच्या स्फूर्तीचे अखंड निधान ठरलेला आहे. पोवाड्यांची परंपरा मराठशाहीतील शाहिरांनी पुढे चालवली, विकसित आणि समृद्ध केली. मराठशाहीच्या सुखदुःखाशी ते समरस झाले होते. त्यांनी शूरमर्दांच्या पराक्रमाचे पोवाडे लिहिलेच पण पानपतच्या घनघोर युद्धात हजारो

मराठ्यांनी मरणाचे कसे स्वागत केले त्याची उदात्त करुण कहाणीही पोवाड्यांतून सांगितली. या शाहिरी कलेला जात माहीत असते ती एकच—शूरमर्दांची; धर्म माहीत असतो तो एकच—स्वदेशासाठी मरण्याचा; हे पेशवाईतील लहान-थोर शाहिरांनी कृतीनेच पटवले आहे. सगनभाऊ मुसलमान होता आणि रामा सटवा मांग किंवा रामोशी होता, असली नोंद खानेसुमारी करणाऱ्यांनी हवी तर करावी. त्या दोघांनी पानिपतच्या दारुण पराभवावर वीर आणि करुण रसांचे पवाडे रचले आहेत यात सारे काही आले. होनाजी, रामजोशी, प्रभाकर, परशराम, अनंतफंदी या समाजाच्या नाना थरांतल्या शाहिरांनी महाराष्ट्र धर्माच्या अभिनिवेशाने मराठशाहीचे पवाडे गायले आहेत. 'भाऊ नाना गिलच्यावर तलवार गेले धरून' या अभिमानाने त्यांचा ऊर भरून आला. पानपतावर बाण-बंदुकांच्या फैरा झडताना मागे न हटणाऱ्या भाऊसाहेब पेशव्यांची इरेसरी ते वाखाणतात आणि 'भाऊ उडाला चक्काचूर' याचे दुःखही प्रभावीपणे व्यक्त करतात. नारायणराव पेशव्याचा खून झाला याची शाहिरांना शरम वाटते. दुःखाने वेडा झालेला एखादा लहरी मुकुंदा गाऊ लागतो— 'दखखनचा दिवा मालवला. हिरा हरपला' ; आणि राजसभेत देहांत शासनाची शिक्षा रघुनाथरावाला फर्मावणाऱ्या रामशास्त्र्यांच्या प्रखर शब्दांचा अनुवाद करून सांगतो— 'अपघात करुन मारला सख्ख्या पुतण्याला.' पानपतचा पराभव पचवून मराठ्यांनी आपला दरारा चहू दिशांत बसवल्यानंतर पुण्याला आलेल्या वैभवाचं चित्रही काढावे ते शाहिरांनीच आणि रावबाजीने आणलेल्या अवकळेबद्दल हळहळावे तेही शाहिरांनीच. सवाई माधवरावाचा रंगाचा दरबार रंगवणाऱ्या प्रभाकरानेच खर्ड्याच्या लढाईत निजामाशी यशस्वी झुंज घेणाऱ्या मराठ्यांच्या ऐक्याचे आणि सामूहिक पराक्रमाचे जिवंत आणि रसरशीत चित्र काढले आहे. पुढे मराठशाही गेल्याचे दुःखही व्यक्त केले ते कोण्या शास्त्रयाने, पंडिताने नव्हे... तेही दुःख ओसंडून वाहते फक्त पोवाड्यांतच. 'जरिपटक्याचा हत्ती अमुचा रुतला गाळात' असे पिळवटून म्हणणारा आवाज फक्त शाहिरांचाच. 'राष्ट्र जगले काय आणि मेले काय, यांना सर्व सारखेच.' असे संतापाचे उद्गार काढून टाळकुट्या संतांचा अधिक्षेप करणाऱ्या कोपिष्ट इतिहासाचार्यांना शाहिरांच्यावर अशी आग कदापि पाखडता येणार नाही. समाजाच्या सुखःदुखाशी शाहीर समरस झाले ते कर्तव्यभावनेने नव्हे तर समाजाच्या सुखःदुखी मिळालेपणाची भावना स्वाभाविक त्यांच्या मनात होती म्हणून.

अव्वल इंग्रजीतही पंडिती काव्याचा ऱ्हास होत गेला असला तरी शाहिरांच्या हातातला डफ तापलेला होता आणि तुणतुण्याची तार तारस्वरात झंकारतच होती. ऐन पराक्रमाचे दिवस मावळले होते, पण कुठेतरी कधीतरी गरिबांच्या कळवळ्याने वेड्यासारखे लढत रहाणारे एकांडे वीरही होतेच. भाबड्या शाहिरांना तंट्या भिल्लाची मर्दुमकीही रुचायची आणि हिकमती उमाजी नाईकाची हिंमतही त्यांच्या कवनांचा विषय व्हायची. ऐतिहासिक दृष्टी नसणाऱ्या आपल्या समाजाने गावोगावच नव्हे तर रानोमाळ पसरलेल्या पवाडेकारांची

नोंद दप्तरात केलेली नसली तरी आजही असलेल्या अतूट परंपरेवरून अशी शाहिरी जिवंत असल्याची कोणाचीही खात्री पटेल. चव्हाट्यावर, चावडीच्या ओट्यावर, हनुमंताच्या देवळालगत, वट-पिंपळांच्या पारावर, साहुकाराच्या अंगणात आणि कष्टकऱ्यांच्या कंगाल वस्तीवर मिळेल त्यावर समाधान मानणारे, हालात आणि गरिबीत जगणारे पण तरीही आपला आवाज आणि डफ-दिमडी तापलेली ठेवून खड्या सुरात पवाडे गाणारे कितीतरी अज्ञात आणि अनामिक शाहीर १९ व्या शतकात मराठभूमीत हिंडत राहिले असतील. शिष्ट आणि नागर समाजाला त्यांचा थांगपत्ता असेल किंवा नसेलही; पण 'वहाण पायी अंगि कांबळी, उशाखालि धोंडा' अशी राहणी असणाऱ्या शेतकऱ्यांना, कष्टकऱ्यांना, कारूनारूंना या शाहिरांची नक्कीच जानपहचान होती. शाहिरांचा श्रीमंत आश्रय तुटलेला होता, पण आपल्या भाकरीतला अर्धा कोर त्यांना देणाऱ्या उदार माय-बापांची वाण नव्हती. पुन्हा ते शाहीर तरी कोण? शाहिरीची मिरास भटाब्राह्मणांनी केव्हाच सोडली होती. इमानदारी होती ती नीच मानल्या गेलेल्या कनिष्ठ जाती जमातीत. पडत्या काळातही लोककला जगवल्या गोंधळ्यांनी, पोतराजांनी, वासुदेव-भुत्यांनी आणि व त्याहूनही शाबास म्हणजे महार-मांग-रामोशांनी, उगीच नाही, 'बामणा घरी लिवणे नि महाराघरी गाणे' अशी लोकोक्ती पडली. हा वाणवसा सत्यशोधक समाजाने व आंबेडकरी जलशांनी टाकला तर नाहीच, उलट त्यात समकालीन विषय आणून विषमता आणि अन्याय यांच्याविरुद्ध जनमानस तयार करण्यासाठी या हत्यारांना त्यांनी नवे पाणी चढवले. २० व्या शतकाच्या पूर्वार्धात राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी जी प्रदीर्घ झुंज झाली तिचेही प्रतिबिंब नागर साहित्यापेक्षा या रांगड्या साहित्यातच पहायला पाहिजे. आजही सहज आठवण केली तरीही कोल्हापूरच्या लहरी हैदरसाहेबापासून लालबागच्या अण्णाभाऊ साठे, अमरशेखांपर्यंत पाचपंचवीस शाहिरांची नावे नजरेपुढे तरळू लागतात. मुचाटे, खाडिलकर उर्फ पांडुरंग शाहीर, नानिवडेकर, दीक्षित, शंकर निकम अशा शाहिरांनी ज्यांची राष्ट्रीय वृत्ती जागवली आणि पेटवली अशी माणसे आपल्या सुदैवाने आजही हयात आहेत. स्वातंत्र्यानंतरही सामाजिक प्रबोधनासाठी आणि उदात्त विचारांच्या प्रसारासाठी कंबर कसलेले आणि हातात डफ घेतलेले शाहीर महाराष्ट्राच्या सर्व विभागांत झाले आणि आहेत. निकटवर्ती असल्यामुळे असेल, शाहीर लीलाधर हेगडे यांचे नाव हाताच्या पहिल्या बोटावरच येते. आता चार तपे होतील, तापवलेल्या कड्यावर कडकडून थाप मारीत हा शाहीर पोवाडे गातोच आहे. तसेच आपले शाहीर साबळे, एक अव्वल दर्जाचे गायक शाहीर. अर्थात इतरत्रही सांगली-सातारा-कोल्हापूरकडे, वाईला, खानदेशात, मराठवाड्यात, वऱ्हाडातही तडफदार शाहीर आहेत याची मला जाणीव आहे. आत्माराम पाटील, पवार, वनमाळी, वाईकर, देशपांडे, शाहिरांतले शेलारमामा पिराजीराव सरनाईक यांचा मला विसर पडणे शक्य नाही.

येथे मी म्हणजे कोण ? मला म्हणजे कोणाला ? तर मी म्हणजे प्राध्यापक वसंत बापट

नव्हेच, पण आजवर महाराष्ट्राने ज्याचे खूप कोडकौतुक केले तो कवी वसंत बापटही नव्हे. येथे मी म्हणजे शाहीर वसंत बापट. लावणी आणि पोवाडा या दोहोंवर निहायत खूष असणारा मी, पण तोही येथे अर्धाच - पोवाडेकार ! आणि पोवाडेकारांतलाही अर्धा शहाणा ! पोवाडे रचणारा पण ते गाण्यासाठी गाता गळा नसणारा. अर्थात झील धरण्यापुरती गायनी कळा माझ्या अंगी नाही असे नाही. माझ्या समजुतीप्रमाणे पोवाड्याची म्हणून एक लयकारी असते. ती आशयानुरूप वळणे घेते. ती मला बऱ्यापैकी समजते, पण फडाचा नायक आपण होऊ शकणार नाही हे मात्र मला उत्तम समजते ! या उलट लीलाधर हेगडे. तेही अर्धे शहाणे. पोवाडे सादर करण्यात तरबेज. मग आम्ही काय केले ? मी पोवाडे रचावे, गाणाऱ्या शाहिराने ते सादर करावे. हे असे गेली ४३ वर्षे चालले आहे. हवे तर आंधळ्याची आणि लंगड्याची जोडी म्हणा किंवा रचणारा होनाजी, गाणारा बाळा; रचणारा प्रभाकर, गाणारा महादेव किंवा गंगाधर या परंपरेचे आणखी दोन पाईक म्हणा.

आधुनिकांत आपल्या इतर साहित्यसेवेबरोबरच हे शाहिरी कवित्वही जपावे, जोपासावे असे फारसे घडलेले दिसत नाही, केशवसुतांच्या तुतारीला सामाजिक सुधारणेचा पोवाडा असे आपण म्हणतो, ते केवळ लक्षणेने. गोविंदाग्रजांना प्रेमाचे शाहीर हे बिरूद जनतेने दिले ते मुख्यतः त्यांच्या प्रेमावरच्या प्रेमासाठी. सावरकरांनी पोवाडे रचले ते मुख्यतः त्यांच्या मित्रमेळ्यासाठी, पण पुढे त्यांच्या तुफान जीवनसरणीत आणि खडतर मार्गात अधिक शाहिरी करण्याएवढी सवड त्यांना उरली नाही. अलिकडील काळात ग. दि. माडगूळकर हा हरहुन्नरी कवी पोवाडाही रचून गेला आहे. या ना त्या कारणाने त्यांनाही त्या मार्गाने दीर्घकाळ जाता आले नाही. हे असे का झाले असेल ? राजसंन्यास लिहिणाऱ्या मराठी भाषेच्या त्या थोर मानकऱ्याला आयुष्यच कमी मिळाले. एरवी गडकऱ्यांच्या रसवंतीने पवाड्याचा ठसठशीत दागिना नैसर्गिक विभ्रमाइतका सहजपणे धारण केला असता. पण ते घडायचे नव्हते. प्रबळ कृतिशील आयुष्यामुळे डफ-ढोलकीकडे वळायला सावरकरांनाही फुरसत मिळाली नाही. गीतमोहिनीने माडगूळकरांना एवढे भारून टाकले आणि चित्रमय गीतसृष्टीत ते इतके रमले की धकाधकीची शाहिरी सांभाळणे त्यांना दुरापास्त झाले. येथे उल्लेखिलेल्या थोर शारदापुत्रांच्या तुलनेने ज्याची शिदोरी तुटपुंजी आहे आहे त्या मी मात्र शाहिरी कवित्व सातत्याने करीत राहावे हे एक आश्चर्यच घडले आहे. पण हे आश्चर्य मी मुद्दाम घडवलेले नाही. मी कोणाशीही होड घेतलेली नाही. स्पर्धा करण्याची ताकदही बहुधा माझ्यात नसावी. मग शाहिरी कवित्व मी सांभाळले ते नेमके कशामुळे ? माझ्या शाहिरीमागच्या प्रेरणा कोणत्या ? व्यावहारिक भाषेत विचारायचे तर या फंदात मी का पडलो, कसा पडलो ? आणि ही प्रचारकी कविता आहे असल्या शिष्ट संभावनेला शरण जाण्याचे नाकारून मी या वाटेवर चालत कसा राहिलो ? खरे म्हणजे या प्रश्नांची उत्तरे मी देण्यापेक्षा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करणाऱ्या एखाद्या तटस्थ अभ्यासकाने वस्तुनिष्ठ दृष्टीने

द्यायला हवीत. तूर्त ही उत्तरे मीच देतो, किंवा त्यासाठी माझ्या या वाटचालीची थोडीशी हकीगत सांगतो.

शाळकरी वयातली गोष्ट. आम्ही मुलांनी पोवाडे म्हणावे असे काही उत्साही गुरुजनांनी ठरवले. हा त्यांचा उत्साह मुख्यतः दोन गोष्टींवर आधारलेला होता— देशभक्तीने भारलेले ते दिवस होते अन् शिवाजीतानाजींचे पोवाडे म्हणून आपण गनिमी काव्याने राष्ट्रीय कार्य करीत आहोत असे किंचित भित्र्यांनाही तेव्हा समाधान मिळत असे. खाडिलकर, नानिवडेकर प्रभृतींचे पोवाडे हजारोंनी ऐकावे असे ते दिवस होते. मग आम्ही दर वर्षी माघ वद्य अष्टमीला सिंहगडावर जाऊन नरवीर तानाजीच्या पुण्यतिथीला पोवाडे गाऊ लागलो (अर्थात दुसऱ्यांनी रचलेले.) पोवाडा या प्रकाराची भरपूर जाण लहानपणीच मला आली ती यामुळे. पुढे कॉलेज जीवनाच्या पहिल्या तीन वर्षांची नाकर्तेपणाची, सुखवस्तू कारकीर्द मी संपवली ती १९४२ च्या बंडात उडी घेऊन. या अनुषंगाने विकसित होत जाणाऱ्या माझ्या कवित्वशक्तीची दोन रूपे होती. एक होते समुदायाने म्हणण्यासाठी रचलेल्या गीतांचे आणि दुसरे डफ-तुणतुण्यावर कडाक्याने गावे अशा पवाड्यांचे. या दोहोंचा मी मनापासून स्वीकार केला होता, आणि आजही मला या दोहोंविषयी जिव्हाळा आहे. 'शिंग फुंकिले रणी' या गीतसंग्रहात यांतले पहिले रूप दिसते, आणि आता 'शूर मर्दाचा पोवाडा' या पोवाड्यांच्या संग्रहात दुसरे.

शाहिरी वाङ्मयाची ओढ मला असती, आणि काव्यरचनेचे विविध प्रकार अंगीकारावे अशी महत्त्वाकांक्षा किंवा शक्ती असती तरीही माझ्या हातून पोवाडे रचले गेले असतेच असे नाही; पण माझ्या आयुष्याचा प्रवाह ज्या मार्गाने जात राहिला तो मार्गही मुलखावेगळा होता, म्हणूनच माझ्यामधला शाहीर जिवंत राहिला असे मागे वळून पाहाताना आज मला वाटते. १९४२ च्या आंदोलनात मी अंगेजणीने भाग घेतला होता; पण मरण आले तरी बेहत्तर या निश्चयातल्या अभंगपणाची कसोटी माझ्या वाट्याला आलीच नाही. मी भूमिगत होतो, मला शिक्षा झाली, स्थानबद्ध म्हणूनही कारावासात होतो ही गोष्ट सत्य असली तरी मी माझ्या अंगीकृतासाठी फार कष्ट केले असे माझ्याच्याने म्हणवत नाही. मी आता स्वातंत्र्य-सैनिक या पदवीला लायक ठरलो आहे आणि या गोष्टीचे लाभही मला मिळत आहेत. कधी आपल्याशीच मी पुटपुटतो, 'अरे, ते मंतरलेले दिवस तुझ्यापुरते तरी बेहोषीचे आणि आनंदाचे ठरले; तुझा बंदिवास म्हणजे एखाद्या वसतिगृहातल्या जीवनासारखा तर होता.' पण यापेक्षाही माझ्या मनात संमिश्र भावनांचा कल्लोळ उसळतो तो वसंत दाते या माझ्या मित्राला महाडच्या गोळिबारात वीरमरण आले त्या हकीगतीमुळे. ४२ च्या या अखेरच्या बंडात हुतात्मे झालेल्यांची नावे डोळ्यापुढून तरळत जातात. हेमू कलानी, भाई कोतवाल, शिरीषकुमार आणि वसंत दाते हे तर माझ्या पोवाड्यांचे नायकच आहेत. पण त्यांच्याखेरीजही अष्टी, चिमूरपासून सातारा-कोल्हापूर-बेळगावपर्यंत अनेक रोमहर्षक

समरप्रसंग झाले आणि कैकांनी प्राणाहुती दिल्या. त्यांच्या थोरवीची कल्पना करताना मला माझे थिटेपण फार छळू लागते. पुढेही हैद्राबाद, गोवा याचे मुक्तिसंग्राम, तसेच संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन आणि अखेर १९७५ चे आणीबाणीचे काळे पर्व या सर्वांत आपण प्रत्यक्ष भाग घेतला नाही याचीही खंत वाटते. मात्र १९४२ पासून घडले ते एवढेच की, स्वतंत्र भारतातील सर्व वाऱ्यावादळांपासून मी मनाने कधीच दूर राहिलो नाही. प्रत्यक्ष कृती जमली नाही खरी; पण घडणाऱ्या महाभारताच्या प्रत्येक पर्वात संजयासारखा मी साक्षी तर होतो ना ! धृतराष्ट्रासारखा आंधळा नव्हे तर तर संजयासारखा डोळस साक्षी ! कदाचित म्हणूनच आपल्या अंगी असलेल्या चिमुकल्या शक्तीच्या आधारे आपण वीरांची गाणी गावी, बलिदानाचे पवाडे रचावे अशा एक प्रकारची पळवाटही मी काढली असेल.

स्वातंत्र्यानंतरची ३६ वर्षे मी राष्ट्र सेवा दलाच्या कलापथकाची बरीच जबाबदारी सांभाळली. आधी १९४६ साली साने गुरुजींच्या प्रेरणादायी सहवासात गाणी म्हणत, पोवाडे-तमाशांचे कार्यक्रम करीत महाराष्ट्र पिंजून काढला होताच. पुढे कलापथकाच्या रथाचा सारथी झाल्यानंतर देशभर अनेकवार मी हिंडलो फिरलो. कलापथकाने माझ्या शाहिरी वृत्ती चेतवल्या, त्यांना भरपूर वाव दिला, हे देखील माझ्या शाहिरी कलेला उपकारक ठरले आहे.

प्रथम प्रथम पोवाडे रचले ते भूमिगत असताना आणि तुरुंगात. त्यानंतरच्या रचना भटकंती करीत असताना विसाव्याच्या पडावांवर. मग कधी आकाशवाणीसाठी, कधी आमच्या फडाची सामग्री श्रीमंत करण्यासाठी. गांधीजींची जीवनयात्रा संपली ती एका भीषण नाट्य प्रसंगामुळे. महात्माजीच सर्व हुतात्म्यांचा मेरुमणी ठरतात. लोकमान्य टिळक, सरहद्द गांधी हे युगपुरुष आणि अवघ्या महाराष्ट्राचे कुलदैवत छत्रपती शिवाजी यांच्यावरही मी पोवाडे रचले. हुतात्मे जसे थोर तसे जन्मभर कठोर व्रत सांभाळणारेही थोरच. म्हणून मला टिळक आणि बादशहाखान हे वीरगाथांचे नायकच वाटतात. काश्मीरवर हल्ला झाला तेव्हा मकबूल शेरवाणीने बारामुल्ला गावात आपल्या बलिदानाने काश्मीरचे नाव जगात उजळ केले. अशा घटना काही क्षणांतच घडून जातात पण त्यांचा परिणाम शाश्वत असतो. पोवाड्यांचा जन्म होण्यापूर्वी अंतर्यामी जो प्रक्षोभ निर्माण होतो तो प्रक्षोभच वीररसाने परिपूर्ण, करुण आणि उदात्ताचे पोषण करणारी शब्दकळा जन्माला घालतो. माझ्या जीवनात मी अनुभवलेल्या अशा अनेक उत्कृष्ट क्षणांची अपत्ये म्हणजे हे पोवाडे आहेत. सगळेच पोवाडे तसे आहेत असे मी म्हणत नाही. काही पोवाडे सभारंजनासाठी किंवा कार्यक्रम सजवण्यासाठी मी लिहिले असतीलही. काही पोवाड्यात विशुद्ध भावनांपेक्षा शब्दक्रीडा मातब्बर ठरली असेल. पण प्रामुख्याने या पोवाड्यांची निर्मिती थोरांच्या व्यक्तिजीवनाने भारावून गेल्यामुळे किंवा प्रक्षोभक घटनांमुळे झालेली आहे.

पोवाड्यांची भाषा आंतरिक दाबामुळेच ठोसर आणि कणखर बनलेली असते. जनसामान्यांच्या भाषेशी, मऱ्हाठीच्या रांगड्या वळणाशी ही भाषा इमान राखते. मात्र ज्ञानेश्वरांना, 'देशी' भाषेचे वैभव वाढवायचे असूनही, शारदेचे स्तवन करताना 'अभिनववाग्विलासिनी चातुर्यकलाकामिनी विश्वमोहिनी' अशी प्रौढ संस्कृत-प्रचुर शब्दकळाच रुचली... तशी शाहिरी कवित्वाची भाषाही प्रसंगानुरूप रांगडेपण टाकून जरा नागरी परिवेष धारण करते. अर्थात कोणत्याही प्रसंगी तिला जनसामान्यांच्या क्षितिजापलीकडे जाता येत नाही.

आधुनिक पोवाडा हा मुख्यतः खाडिलकर प्रभृती २० व्या शतकातील शाहिरांनी निर्माण केलेल्या धाटणीचा असतो. तो अनेक चौकांचा म्हणजे अनेक प्रकरणांचा असतोच असे नाही. पोवाड्याच्या रचनेत मुख्य भाग असतो तो मात्रावृत्तांचा म्हणजे जातींचा. मात्र जातिरचनाही सैल, सुटसुटीत केलेली असते. हे ओढाताणीचे समर्थन नाही. पण बोलभाषेतील मुक्त चलन, नाट्यानुकूलता आणि वक्तृत्वमूल सरणी या आवश्यक घटकांच्यामुळे पोवाड्यांच्या रचना सैलसर होणे स्वाभाविक आहे हे येथे ध्यानात ठेवले पाहिजे. पोवाड्यांच्या रचनाबंधाचे अनेक प्रकार आहेत आणि ते आशयानुरूप तसेच एकसुरीपणा टाळण्यासाठी आलटून पालटून उपयोजिले जातात. दांगट चाल, कटाव, एकचरणी साकी किंवा चंद्रकांत आणि कथनाला उपयुक्त असे पाच किंवा सहाचरणी बंधही पोवाड्यात येतात.

मुख्य गोष्ट आहे ती पोवाड्याच्या पोवाडेपणाची. पोवाड्याचा आकृतिबंध काहीही असो, त्याचे अंतःस्वरूप एकच आहे. पोवाडा म्हणजे महाकाव्य नव्हे, कथाकाव्य नव्हे, खंडकाव्य नव्हे, वार्तालाप नव्हे आणि अनेक घटनांचे क्रॉनिकल उर्फ रपोटही नव्हे. ते शुद्ध नाट्य नव्हे, काव्य नव्हे, सरधोपट कथनही नव्हे. या नेति नेति लक्षणांचा अभिप्राय काय आहे ? कधी कथन, कधी नाट्य, कधी काव्य, कधी उद्‌बोधन, कधी रंजन अशा नाना माध्यमांतून पोवाडा आपल्या श्रोत्यांशी हृदयसंवाद करीत असतो. आपल्या हृदयींचे लक्षावधी हृदयांत ओतावे अशा ईर्ष्येने शाहिराने केलेले ते प्रकट भावप्रसरण आहे. शाहिरी कला अर्थातच एक प्रयोगसिद्ध कला आहे. अचाट अत्युक्ती, किंचित भडकपणाकडे झुकलेले नाट्य आणि लयदार प्रभावी वक्तृत्व अशा त्रिविध गुणधर्मांचा आश्रय शाहीर करतो आणि हे सर्व शाहिरी कलेचा परिपोष करणारेच असते. शाहीर बहुजनांचा वार्ताहर असतो, कथाकार असतो, जागल्या असतो आणि घटना जिवंत करणारा बहुरूपी नटही असतो. हे सर्व रसायन फक्कड जमल्याशिवाय पोवाडा आकार घेत नाही आणि सादर केला तरी वठत नाही. इतर काव्यबंधांप्रमाणे पोवाड्यालाही आदि-मध्य-अंत हे अवधान सांभाळावे लागते. चांगल्या पोवाडेकाराची कसोटी तपशिलवार वर्णन करण्यात लागत नाही; उत्कर्षबिंदू कोणते हे अंतःप्रेरणेन ओळखून तेथे उत्कट भावनेचा परिपोष तो कसा

करतो यावर त्याचे यश अवलंबून असते.

हे आणि असे किती सांगावे ? आणि तेही जरा एखादे पान उलटल्यावर प्रत्यक्ष शाहिरी कृतींच्या अंगणात प्रवेश करत असताना ? आता क्षणभर असेच समजा, दिवट्या फुरफुरत आहेत, डफ तापलेला आहे, तुणतुण्याची तार सुरेलपणे बोलायला आतुर आहे, खंजिरी-मंजिरी किणकिणत आहेत आणि तुम्ही निःशब्द एकान्तात वाचत असलात तरी तुमच्या कानावर रांगडा खडा सूर पडणार आहे. शूर मर्दाचा पोवाडा शूर मर्दानं गावा आणि शूर मर्दानं ऐकावा. ऐका तर— आम्हीही मनशूर, तुम्हीही मनशूर !

वसंत बापट

# अनुक्रम

## कवने


| | | |
|---|---|---|
| १ | भारतमाते, नमन तुला | १ |
| २ | चल रसिकरंजना | २ |
| ३ | शाहीराचा घ्या मुजरा | ४ |
| ४ | रंगदेवते | ६ |
| ५ | अहो रसिकवरा चातुरा | ८ |


## पोवाडे


| | | |
|---|---|---|
| १ | छत्रपती शिवराय | ११ |
| २ | पहिले स्वातंत्र्यसमर | २३ |
| ३ | लोकमान्य टिळक | २७ |
| ४ | गांधीजींची जीवनयात्रा | ३३ |
| ५ | सरहद्द गांधी बादशहाखान | ५३ |
| ६ | सह्याद्रिसिंह भाई कोतवाल | ५९ |
| ७ | हेमु कलानी झिंदाबाद | ६४ |
| ८ | वसंत दाते अमर जाहला | ६६ |
| ९ | स्वातंत्र्यसूर्य उगवला | ६८ |
| १० | काश्मीरवर घाला | ७२ |
| ११ | हुतात्मा मकबूल शेरवाणी | ७५ |
| १२ | दारूची कहाणी | ८२ |
| १३ | गोमंतकाचा मुक्तिसंग्राम | ८५ |
| १४ | संयुक्त महाराष्ट्र | ९१ |


## कैफियत


| | | |
|---|---|---|
| | शाहीरांना मानाने वागवा | ९६ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## भारतमाते, नमन तुला

रंगभूमिवर दिवे लागले भारतमाते नमन तुला
आशीर्वादा देइ अम्हांला धडपडणाऱ्या सर्व मुलां
भारतमाते नमन तुला गे भारतमाते नमन तुला

सुजला सुफला प्रेममयी तू जननी अमुची तू अतुला
कीर्ती भिडली सात सागरां लंघुन गेली हिमाचला

पूजा तूझी कशी करू गे कुठून आणू सांग फुलां
अमुचे हासू, अमुचे आसू वाहु तुझ्या गे पदकमलां

दास्य संपले हास्य शोभले तेज झळकले मुखकमला
शिंपण करुनी निजरुधिराचे बहरा आणू तुझा मळा

तू पूर्वेचा तारा उज्ज्वल शांतीचा संदेश दिला
अमुच्या भाळी सदा शोभु दे तुझ्या मातिचा दिव्य टिळा

तार तार झंकारत बोले ताल ताल सांगतो तुला
डफदिमडीची शाहीराची अर्पण केली तुला कला

## चल रसिकरंजना

चल रसिकरंजना
करु गायऽऽना वादना
यश मिळण्याला
परमेशाला प्रार्थना

स्फूर्तीऽगावयाला द्यावी,
वृत्तीऽध्येयवादी व्हावी
आशीर्वादा
द्या अशा मधुसूदना

लावाऽलावणी ढंगात
जाऊऽरंगुनी रंगात
रंगतरंगी
घालु नयनी अंजना ।।

रसिकाऽऐकवा पोवाडा
वीणाऽअंतरीची छेडा
हसताहसता
शिकवण्याची कामना।।

ऐका-मंडळी भवताली,
द्या होऽद्या समेवर टाळी
खुलुनी खुलवा
शाहिराच्या गायना ॥

अमुचाऽशाहिरी बाणा हो,
ध्यानीऽआपुल्या आणा हो
देशासाठी
चालविली ही साधना ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ............
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## शाहीराचा घ्या मुजरा

या हो या हो रसिकवरा, द्या कान जरा, लावा नजरा
शाहीराचा घ्या मुजरा ॥

सह्याद्रीच्या पाषाणाचे पाणी अमुच्या हातांत
परी विनोबा, गांधी, गुरुजी यांची वाणी चित्तात
त्या पाण्यातुन, त्या वाणीतुन उसळे अमुचा गानझरा
द्या कान जरा, लावा नजरा, शाहीराचा घ्या मुजरा ॥ १ ॥

तक् थय तक् थय या तालावर
धागिनातिनकधिन् या बोलावर
रुमझुम रुमझुम वाजति घुंगुर
बालबालिका सान वेलिंपरि नाचनाचती रंगात
अर्थ नवा निःस्वार्थ भरे परि त्यांच्या रंगतरंगांत
या तालावर या बोलावर झुलवा झुकवा मान जरा
द्या कान जरा ॥ जी ॥

मर्द मराठी थाप डफावर
खणखण खंजिरि बोले सत्वर
तुण्तुण् तुण्तुण् म्हणे तुणतुणे
छुनुनुकु छुनुनुकु झांज किणकिणे

सूर खडा शाहीर धडाडा म्हणे पवाडा जोसात
थेट तशी मग नेट लावुनी सूरकरी करती साथ
नसानसांतिल रक्तरसाला येइल आज उधाण जरा
द्या कान जरा ।। ३ ।।

ब्रह्मानंदापरी खरोखर काव्यरसाचा आनंद
लुटा लुटा तर रसिकभृंग हो काव्याचा हा मकरंद
काव्यदर्शनी मनी हर्षुनी विसरा विसरा भान जरा
द्या कान जरा ।। ४ ।।

चल माझ्या सर्जा, चल माझ्या राजा
रंग्या गंग्या काश्या वाश्या । दावू आपण नवा तमाशा
नवा जमाना जुनीच भाषा । पब्लिकची घालवू निराशा
गब्रू अब्रूदार ढोंग कुणि समाजात ते माजविती
अमुच्यावाणी परी शहाणी नकली नाणी बाजविती
हासू हसवू, बोधा ठसवू, द्या बंधूंनो ध्यान जरा
द्या कान जरा ।। ५ ।।

## रंगदेवते

रंगदेवते, मंगलमाते, भराभरा भर रंग
लोकरंजनी तुझ्या पूजनी करी सदोदित दंग
भराभरा भर रंग

शिकव अम्हांला सगनभाउची सगुण लावणी ग
शिकव अम्हांला रामजोशिची कोकिळ-वाणी ग
शिकव अम्हांला होनाजीची बुलबुलगाणी ग
परशुराम कविचे गोड ते छंद, धुंद बेबंद,
देति आनंद, न हो रसभंग
अशि तऱ्हा शिकव शाहिरा, उसळु दे जरा, खरा रसरंग ॥ १ ॥

अगिनदासचा तो खडा बोल खणखणित
प्रभाकराची जडणघडण कडकडित
अनंतफंदीची लावणी ग रसरशित
बापुराव पठ्ठे, बहाद्दर शूर, कवी मशहूर,
ऐकता सूर गुंग सारंग
अशि तऱ्हा शिकव शाहिरा उसळु दे जरा, खरा रसरंग ॥ २ ॥

श्रमणारे खपती सतत मोडुनी अंग
ऐतखाउ इकडे सजविति रंग-पलंग

धनिकशाहिने या गरिब गुरिब हो तंग
या अपंग दलितांना येउ दे जोश, थांबु दे शोष,
क्रांतिचा घोष करू निःसंग
रे उठा पटापट, करा झटापट, वसंत बापट करी नवे नित ढंग
चला करा तर जंग ।। ३ ।।

## अहो रसिकवरा चातुरा

अहो रसिकवरा चातुरा,
गुणसागरा, वळू द्या जरा, कृपाळू नजरा
घ्या अमुचा पहिला मुजरा ॥

रंगात भरू दे रंग
तालात होउ या गुंग
रोमांचित होवो अंग,
तुम्ही रसभृंग,
लुटा रस चतुरा ॥ १ ॥

बघुनी हा रसिक समाज,
वाद्यांचा स्फुरतो साज
हा प्रसन्न होवो आज अम्हा रसराज
लाभ नच दुसरा ॥ २ ॥

छुन् छुनुक छुनुक वाजतील घुंगुर पायीं
धा धिनक धिनक धिन् करी ढोलकी घाई
शाहीर मोकळा गळा करुन मग गाई
रंगदेवते शिरी, बांधिला वरी, स्वरांचा गजरा ॥ ३ ॥

# पोवाडे

## छत्रपती शिवराय

धन्य धन्य शिवाजी महाराज वीर रणधीर
स्वराज्याचा पाया घातला ज्यानं खंबीर
लोकांचा राजा न्यायी गुणगंभीर
शिवछत्रपतींची कीर्ती, दिगंतावरती
पवाडे गाती कवी शाहीर ।। जी ।।

ऐका ऐका ऐका नरनारी, सांगतो सारी, कहाणी न्यारी,
असा राजा न पुन्हा होणार ।
राष्ट्राचा झाला तारणहार ।
म्हणुन शाहीर कीर्त गाणार ।। जी ।।

मायभवानीचा गोंधळी आला तुमच्या दारी
माझी ऐका बात न्यारी, भीमाशंकराशेजारी,
आहे किल्ला शिवनेरी, राजे भोसल्यांच्या घरी,
जिजाऊला लेक जाहला । संभाजीला भाऊ धाकला ।
जसा शुक्लपक्षीचा चंद्र वाढु लागला ।। जी ।।

जिजाऊच्या नशिबाचा गेला वनवास
आले सौख्य बहरास, स्वर्गसुख हो जीवास,
तळपतो दिवा वंशाला । तारणहार देशाला ।

केली शर्थ जिवाची शिवा मोठा जाहला ।। जी ।।

कंसाची मथुरापुरी, राज्य आसुरी, तसा विजापुरी,
राज्य करि आदिलशहा सुलतान।
दरबारात होते कैक हैवान।
घालती जुलमाचे ते थैमान ।। जी ।।

राजे शहाजी भोसले शूर, लढाईत चूर, भोळे भरपूर,
दरबारात शत्रु होते त्यांना फार।
सुलताना कानमंत्र देणार।
शहाजी तुमचं राज्य घेणार ।। जी ।।

पुरं धोकेबाज विजापूर। अचानक उठलं काहूर। निसटला शहाजी शूर। उधळला घोडा चौखूर। त्यानं गाठलं थेट बंगळूर। संसार ठेवला दूर। जिजाबाई दुःखानं चूर। दिनरात्र डोळ्याला पूर।
पतिवीण करू तरि काय, कसा धरु धीर ।। जी ।।

कृतनिश्चय झाली ती शिवबाची माता
ती म्हणे शिवा तुज मायबाप मी आता
श्रीरामाऐसा होई तू शककर्ता
शिवा म्हणे वाहतो आण,
सतीचे वाण घेतले जाण स्वराज्याकरिता ।। जी ।।

कारभारी दादोजी लाखामधे एक
मोठे इमानाचे नेक, त्यांच्या हाती दिला लेक,
शिकविल्या हो नाना कळा। मुलखाची दावली अवकळा।
आयाबाया सोसत्याती छळा। रयतेचा झाला पाचोळा।
कळवळे शिवा कोवळा।
जमविला एकनिष्ठेचा मर्द मावळा ।। जी ।।

जरि बालवीर कोवळा, जमविला मेळा, मर्द मावळा,
रोहिडेश्वरा साक्ष ठेवून।
बोलला शिवा लाल होऊन।
लढू या प्राण पणा लावून ।। जी ।।

गोकुळचा नंदकिशोर। जरि होता वयानं पोर।
तरि प्रताप त्याचा थोर। केला ठार कंस शिरजोर।
सारी पृथ्वी झाली बिनघोर। तसा आपण धरू या जोर।
बोला बोला माझ्या संगती कोण येणार ।। जी ।।

वानरसेना जरी चिमखडी, राहिली खडी, मावळे गडी,
वचन ते देती शिवबाला।
वाहिले आम्ही प्राण तुजला।
हरहर महादेव बोला ।। जी ।।

भीमसेनापरी बलदंड पासलकर बाजी
अर्जुनापरी तो मालुसरा तानाजी
गनिमाला वाटे यमफास कंक् येसाजी
वीरांना नवे बळ आले,
सरसावुन भाले
सज्ज ते झाले, सारे रणगाजी ।। जी ।।

तोरण्यावरी तोरण बांधून घातला पाया ।। जी ।।
जमविले वीर मावळे राज्य जिंकाया ।। जी ।।
मावळे निघाले आदिलशाही चिरडाया ।। जी ।।
चुटकीसरशी सुभानमंगळ घेई शिवराया ।। जी।।
विजापूर याच्या धाकानं लागे कापाया ।। जी ।।
फितुरांना काढी ठेचून धडा शिकवाया ।। जी ।।
मोऱ्यांचा मूर्ख अभिमान ठरविला वाया ।। जी ।।

गुलामीत जयांना गोडी, नव्हति अशी थोडी, नाठाळ ती घोडी,
शिवबानं वठणीवरती धरली।
गोडिगुलाबीनं आपली केली।
आपल्या करणीनं कुणी मेली ।। जी ।।

अवघड मुलुख जावळी, मोऱ्यांची कुळी,
होति महाबळी, चंद्रराव धुंद होता गर्वात।
टपला स्वराज्याचा कराया घात।
शिवबानं केली त्याच्यावर मात ।। जी ।।

विजापूर चरकले मनीं, वार्ता ऐकुनी, जावळी जिंकुनी,
चंद्ररावाला मारला ठार।
आदिलशाहीचा भरला दरबार।
चूर चित्तात सारे सरदार ।। जी ।।

शिवबाचं ऐकता नाव, मिशीवर ताव, देति उमराव।
थरथरा कापतात परि आत।
अवसान जातं सारं देहात।
कोण उचलील शिवावर हात ।। जी ।।

विजापूरचा क्रूर हैवान, जसा सैतान, नाव अफजलखान,
होता तो दुष्ट आणि बलवान।
उचलुनी घेई पैजेचं पान।
म्हणे शिवबाचा घेतो मी प्राण ।। जी ।।

विजापुराहुन खान निघाला। संगे अगणित बरची भाला। हजार हत्ती बडा रिसाला। बंदुक तोफा अन् जेजाला। तुळजापुरवर घालुन घाला। फलटण लुटुनी वाइस आला। म्हणे कुठे तो चुव्वा लपला। जिवंत धरुनी नेइन त्याला। जा जा सांगा कुणी

शिवाला । हात जोड ये शरण अम्हांला । जर का मजवर हल्ला
केला । तुफान मी, तू केवळ पाला । खान पाठवुन दे
वकिलाला । शिवबा सांगे निरोप त्याला ।। जी ।।

शिवबा म्हणे खान तुम्हि मोठे, चुव्वा मी कोठे, भीति मज वाटे,
कसा मी तिकडे येऊ तोऱ्यात ।
आपणच यावे जावळी खोऱ्यात ।
भेटतो तुम्हा तुमच्या डेऱ्यात ।। जी ।।

महाधुरंधर शिवबानं, दिलं आवतन, डोंगरकाठानं,
यावं तुम्हि जावळीच्या खोऱ्यात ।
रेडा जसा जातो आपल्या तोऱ्यात ।
तसा तो खान आला डेऱ्यात ।। जी ।।

अच्छा अच्छा खान बोलला, खूष मनि झाला ।। जी ।।
एकांतात मारु शिवबाला बेत त्यानं केला ।। जी ।।
मैदान सोडले प्रतापगडावर आला ।। जी ।।
अफजलखान पुरा बेमान ठावे शिवबाला ।। जी ।।
शिवा पुऱ्या तयारीनिशी भेटिला आला ।। जी ।।

चिलखतावर झगा अबाशाही, जिरेटोप डोई, बिचवा एक बाही,
वाघनखे दुसऱ्या बाहीला । संगती शूर जिवा महाला । संभाजी
कावजी जोडीला । शिवाजी डेरेदाखल झाला । खुशी लई
वाटलिया खानाला ।
आवो बेटे आगे तो आओ बोले शिवबाला ।। जी ।।
आवो बेटे गले लग जाओ बोले शिवबाला ।। जी ।।
मै दूंगा कुछ भी तुम चाहो बोले शिवबाला ।। जी ।।

खुनि खुनशी अफजलखान, झाला बेभान, खोट्या प्रेमानं,

आलिंगन देऊ पाही शिवबास।
तू बेटा भतीजा मेरा, शहाजी का छोरा,
भला हो तेरा, आओ मेरे पास ।। जी ।।

निःशंक गेला शिवराय खानाच्या जवळी ।। जी ।।
कालिया कृष्णाला तसा शिवाला कवळी ।। जी ।।
दाबली शिवबाची मान गळा तो आवळी ।। जी ।।
शिवराय होता सावध धुरंधर बळी ।। जी ।।

लांडगा रानदांडगा बोले प्रेमानं
मगरमिठी कोकरु शिवबाला घातली वेगानं
खंजीर खुनी खुपसला अफजलखानानं
वाघनखे बिचवा चालवून, कोथळा काढून
पोट फाडून काढलं सर्जानं ।। जी ।।

वाघनख बिचवा हाति धरून, कुशीमधे शिरून,
पोट त्याचं चिरून,
खानाला शिवा दावी अस्मान।
गेला तात्काळ खानाचा प्राण।
शिवबानं पुरा केला दुस्मान ।। जी ।।

खानासंगं होता सैदबंडा,
खून हातखंडा,
घेउन हाति खांडा,
केला शिवबाच्या शिरावर वार।
जिरेटोपाला लागली धार।
जिऊ महाल्यानं केला त्याला ठार ।। जी ।।

प्रतापगड जागा अवघड, फौजा अवजड,

जातिल काय धड,
मावळ्यांनी केली त्यांची धुळधाण।
कैक लाखांचं केलं शिरकाण।
हत्ती उंटांनी सोडले प्राण ।। जी ।।

नौबत झडे धडधडा,
शिंग चौघडा, सांगे राजगडा,
जिजाऊ धन्य तुझा शिवराय।
कळिकाळाला भील की काय।
आदिलशाहीनं घेतली हाय ।। जी ।।

फडकला मराठी झेंडा गगनावरती
आनंदसमुद्रा प्रचंड आली भरती
हा धन्य धन्य शिवराय जाहली कीर्ती
भयभीत झाली आदिलशाही, तशी निजामशाही
मोगल बादशाही हादरली पुरती ।। जी ।।

विजापुरी झाला हाहाःकार, शिवबानं ठार, केला सरदार,
रागानं लाल झाला सुलतान।
बोले ये शहाजीका संतान।
बन गया पुरा पुरा सैतान ।। जी ।।

बडी बेगम पेटली हट्टाला। सिद्दी जोहर तिने धाडला।
फाजलखान होता साथिला। पन्हाळ्यात शिवा कोंडला।
शिवबानं किल्ला लढविला। दाद नाही दिली खानाला।
तेवढ्यात प्रकार काय झाला। इंग्रेज आला मदतिला।
त्याच्यासंगं तोफखाना आला। तटावर गोळा डागला।
शिवाजीनं विचार काय केला। गड आपल्या हातातुन गेला।
हवी युक्ति अशा घटकेला। शरण येतो बहाणा केला।

फाजलखान मनी हरखला। बक्षिसी दिली फौजेला। जल्लोष सुरू जाहला। हातात शराबी पेला। नाचरंग आला रंगाला। इकडे मध्यरात्र प्रहराला। शिवबानं गुंगारा दिला। बाजीप्रभु घेउन संगतीला। विशाळगडच्या लागला वाटेला।
पन्हाळ्याचा वेढा फोडून सर्जा निसटला ।। जी ।।
पोलादी पिंजरा तोडून सिंह निसटला ।। जी ।।

लपत छपत मग झपझप झपझप। तुडवित राने सपसप सपसप। विशाळगडला शिवा निघाला। फाजलखाँ पाठीवर आला। बाजी प्रभुने विचार केला।
घोडखिंडीमधि अडवू त्याला ।। जी ।।

बाजिप्रभूनं घातली मिठी राजाच्या पाया
खिंडीत अम्हां राहु दे शत्रु रोखाया
तुम्हि खुशाल जावे विशाळगड गाठाया
बाजिची घ्यावि चाकरी,
एकदा तरी, पहा कामगिरी अहो शिवराया ।। जी ।।

अहो झुंज दिली शर्थीनं स्वामिभक्ताने
घोडखिंड झाली पावन मर्द रक्ताने
इशाऱ्याच्या तोफा ऐकून वदे अभिमाने
ऐकले पाच आवाज,
अहो शिवराज, मरण ये आज रणी भाग्याने ।। जी ।।

ऐकून शिवाच्या पराक्रमाचा डंका
औरंगजेब चरकला मनी धरि शंका
जाळाया येतिल वानर माझी लंका
त्याचा मामा शाहिस्ताखान, फौज देऊन,
धाडला त्यानं, प्रसंगचि बाका ।। जी ।।

मोगल फौजा आल्या वेगात, मराठी मुलखात,
झाला उत्पात, शाहिस्ता आला पुणे शहरात।
लावली वस्ती लाल महालात।
शिवबाला चैन नाही दिनरात ।। जी।।

शिवबानं विचार मग केला। खान फार जोरावर आला। जसवंतसिंग त्याच्या मदतीला। कसा निभाव लागेल आपला। बेसावध गाठु या त्याला। शिवाजीनं वेष बदलला। लग्नाचा वऱ्हाडी झाला। चार सहा मित्र सोबतीला। अंधार रात्र प्रहराला। बेधडक आला शहराला। लाल महाल त्यानं गाठला। वाड्यावर छापा घातला। तोबा तोबा ओरडा झाला। बेगमांनी कालवा मांडला। जाग आली त्यानं खानाला। त्यानं पाह्यलं जवा शिवबाला। थरथरा कापू लागला। खान सैरावैरा धावला। खान इकडे तिकडे धावला। खिडकीतून निसटु लागला। शिवबानं वळखलं त्याला। अंदाजानं वार त्यानं केला। घाव बसला त्याच्या पंजाला। बोटांचा तुकडा पाडला।
वाचला खान परि अब्रु गमावुन गेला ।। जी ।।

शाहिस्त्याची बोटे तुटली चिडला आलमगीर
जसा झाला वेडा पीर, आता धरु कसा धीर,
डोंगरचा चुव्वा माजला। याला ठार करिल आजला।
असा वीर माझ्या दरबारी कोण गाजला ।। जी ।।

दरबारात होता मिर्झाराजा जयसिंग
म्हणे जय एकलिंग, या शिवाजीची झिंग,
उतरून टाकतो पुरी। माझी घ्यावी एवढी चाकरी।
बादशहा म्हणे जाणतो तुमची बहादुरी ।। जी ।।

त्याच्यासंगं मदतीला दिला दिलेरखान
होता क्रूर तो पठाण, संगे लष्कर तुफान,

हाहाःकार झाला देशात। आले शिवाजीच्या राज्यात।
जिंकून घेतले कैक किल्ले मुलखात ।। जी ।।

जयसिंगानं केला हाहाःकार लोक गांजले ।। जी ।।
मुरारबाजीपरी मोहरे कैक हरपले ।। जी ।।
शिवबा म्हणे राज्य राखाया हवे आपुले ।। जी ।।

असा विचार करोनी मनी। भेटे जयसिंगाला जाउनी ।। जी ।।
जयसिंग म्हणे शिवबाला। जा भेटा औरंगजेबाला ।। जी ।।
तुम्ही करा शहाला अर्जी। तुमच्यावर होइल मर्जी ।। जी ।।
शिवबानं केला निर्धार। या वेळी घ्यावी माघार ।। जी ।।
पण फिरून येता संधी। शत्रूची उडवू चंदी ।। जी ।।

दुनियेमधि होते कैक तसे नरवीर
कुणि मुत्सद्दी तर कुणी श्रेष्ठ रणधीर
परि खरा दरारा गाजवि आलमगीर
आगऱ्याला भरला दरबार,
मोगल सरदार, कैक लाचार, झुकविती शीर ।। जी ।।

राहिला शिवाजी उभा अशा दरबारी ।। जी ।।
नरसिंह वाटला तेजस्वी अवतारी ।। जी ।।
औरंगजेब तो और धोरणी भारी ।। जी ।।
शिवाजीचा केला अपमान, खवळली स्वारी ।। जी ।।
सह्याद्रि सिंह गरजला हबकली सारी ।। जी ।।

कोंडला शिवा पंजरी, कैद केला तरी, वीर केसरी,
कोल्ह्याला काय शरण जाणार। शक्ति बुद्धिचा शिवा अवतार।
फोडुनी कोंडी झाला पार ।। जी ।।

शिवराज निसटुनि गेला,
कळले औरंग्याला, जळफळाट झाला,

करकरा चावी रागानं दात। गावला चुव्वा होता हातात।
युक्तिनं केली माझ्यावर मात ।। जी ।।

परत घेतले सारे किल्ले। करि शत्रूवर गनिमी हल्ले। दूर दूर
ते गाठी पल्ले। मोगल खजिने त्यांनी लुटले
स्वातंत्र्याचे तुफान उठले ।। जी ।।

वैऱ्याचा घेइ तू सूड, पेटवी चूड, उचल आसूड,
जिजाई बोले शिवरायास।
गडावर जिंकले गड, त्यात अवघड,
किल्ला सिंहगड पाहिजे घ्यायास ।। जी ।।

बेलाग उंच गडकोट, चहुबाजू तट, बिकट लइ वाट,
असा हा किल्ला कोण घेणार।
तानाजी मालुसरा शूर, बहाद्दर वीर,
खरा नरवीर नेक सरदार ।। जी ।।

लेकाचा लगीनसोहळा, गोत झाले गोळा,
मित्रांचा मेळा, उमराठे गावा।
आधी लगीन कोंडाण्याचं, मग रायबाचं,
धाडला राजाला त्यानं सांगावा ।। जी ।।

झरझरा गाठी सिंहगड, भयंकर चढ, कडे अवघड,
भोवती किर्र रान घनघोर।
काळोख भरला त्यात काळाभोर।
गडावर उंच सोडले दोर ।। जी ।।

मराठ्याचा पोर काय कधी मरणाला भ्याला ।। जी ।।
तानाजी मावळ्यांसंग गडावर चढला ।। जी ।।
अंधार रात्र चमकला गडावर भाला ।। जी ।।
उदयभान शूर गडकरी चवताळुन आला ।। जी ।।
भाला बरची ढाल तलवार,

भिडले अनिवार, वारावर वार,
खणाखण झुंज चाले घनघोर।
पराक्रम केला तान्यानं थोर।
हाय परि तुटला औक्षाचा दोर ।। जी ।।

शेलारमामा धावुनी आला त्याच घटकेला ।। जी ।।
दोन्ही हाती पट्टा घेऊन वार त्यानं केला ।। जी ।।
उदयभान एका घावात यमाघरि नेला ।। जी ।।

गड आला सिंह माझा गेला,
दुःख शिवबाला, बोले रायबाला,
शिवाजी मेला, ताना जगणार। वीर तो अजरामर होणार।
पवाडा गंधर्वहि गाणार ।। जी ।।

धन्य धन्य शहाजी जिजामाई, भवानी तुळजाई,
धन्य काळी आई,
शिवाजी शककर्ता ठरणार।
पुत्र हा अमरकीर्ती होणार।
बोला शिवबाचा जयजयकार ।। जी ।।

सन् सोळाशे चौऱ्याहत्तर,
रायगडावर, झाला जयजयकार,
वाद्यांचा गजर भिडे गगनास।
झाला अभिषेक शिवाजी राजास।
हिंदवी राज्य आले-उदयास ।। जी ।।

जरिपटका गगनीं उडे, सह्याद्री कडे, गर्वाने खडे
मातितुन वीर उभे केले। गवताचे झाले लाख भाले।
शिवाजी छत्रपती झाले ।। जी ।।

## पहिले स्वातंत्र्यसमर

ते धन्य खरोखर सत्तावनचे वीर
जे स्वातंत्र्यास्तव झाले पूर्ण फकीर
झुंजार झुंजले परि फिरले तकदीर
काटले रणीं जरि शीर, राहिले खंबीर,
वन्दि शाहीर तयां प्रेमानं।। जी ।।

नानासाहेब पेशवे ब्रह्मावर्ती, मनी तळमळती, दूत पाठवती,
दिल्ली कानपूर मीरत झांशी।
लखनौ अयोध्या नि काशी।
पेटला वणवा अवघ्या देशीं ।। जी ।।

लागले स्वराज्या ग्रहण, त्याच दुःखानं, जे जे रातदिन,
झुरती पंजरात रावे।
करुनिया प्रतिज्ञा घोर, उठा शूर वीर,
युद्ध घनघोर; झणी मांडावे ।। जी ।।

सेनापती तात्या टोपे शूर, मोठा महशूर, जाउनी दूर,
धडकवी आग साऱ्या प्रांतात।
मे महिना एकतीस तारखेला,
करावा हल्ला,
बेत ठरविला होऊन निभ्रांत ।। जी ।।

दोन महिने होते मुहूर्ताला । बराकपूर फौज ठाण्याला । नवा गोरा साहेब एक आला । निगर, सुवर... म्हणू लागला । मंगल पांडे होता जागेला । संताप अनावर झाला ।
सूं सणण् उडाली गोळी, गोरा पुरा केला ।। जी ।।

मंगल पांडेनं धन्य केली कुळी,
तो पहिला बळी, चढवला सुळी,
फौजेला वाटे अपुला अपमान ।
रागानं झाले सारे बेभान ।
साहेबाचं केलं त्यांनी शिरकाण ।। जी ।।

मीरतचा घेतला ताबा, मोर्चा चालला ।। जी ।।
लगोलग झेंडा बंडाचा आला दिल्लीला ।। जी ।।
बहादुरशहा होता दिल्लीच्या लाल किल्ल्याला ।। जी ।।
हिंदवी तख्त चालवा म्हणति ते त्याला ।। जी ।।
कारभार द्यावा राज्याचा नाना पेशव्याला ।। जी ।।
हिंदु मुसलमान हा भेद पार दूर केला ।। जी ।।

ही वार्ता गेली देशात, वीर निमिषात, उठले त्वेषात,
मारो फिरंगीको म्हणती ।
साहेब प्राणभये पळती ।
ठार किति झाले नाही गणती ।। जी ।।

पेटले औध फैजाबाद, झांशी आझाद,
काशी अलाहाबाद,
साहेबाला जागोजाग पिटला ।
इंग्रज खडबडून उठला ।
ऐका इतिहास आता पुढला ।। जी ।।

खल्क खुदाका, मुल्क बाच्छायका, हुकुमत है सिपाहीकी।
वीरगर्जना घुमू लागल्या खळबळ झाली त्रैलोक्यीं ।। जी ।।

दिल्लीस वाजला डंका, हादरली लंका, सोडुनी शंका,
हिंदवी वीर आले बंडात।
पंजाब युक्त-प्रांतात, बिहार-वंगांत
चेतली ज्योत। भरतखंडात ।। जी ।।

दत्तक नाही मंजूर, या सबबीवर, इंग्रज बहादुर,
देशाचे लचके घेती तोडून।
कैकांचे तख्त घेती काढून।
सिंहांना नेती कोल्हे ओढून ।। जी ।।

काव्य

झांशिचे राज्य केवढे, सान बापुडे, इंग्रजांपुढे,
ठाकले उभे तेच समरात।
झांशिला झुंज चाले दिनरात।
तोफांचे गोळे पडति शहरात ।। जी ।।

स्वातंत्र्याची रणलक्ष्मी ती मर्दानी झांशीवाली
मेरी झांशी कभी न दूंगी करी प्रतिज्ञा त्या कालीं ।। जी ।।
रणमैदानी उभी राहिली परजत हातीं तलवार
असा न झाला, पुढे न होइल रणदुर्गेचा अवतार ।। जी ।।

जिंकाया झांशीचा किल्ला। इंग्रज करिती प्रचंड हल्ला। राणीला कुणि देती सल्ला। शरणागतिचा मार्ग चांगला ।। खवळुन उठली ती रणचंडी। म्हणे शत्रुची उडविन मुंडी। उत्तर द्या तोफेच्या तोंडी। प्राणांची करु या कुरवंडी ।। नऊ दिवस ती उभी तटावर। अग्नीची जशि धार अनावर। इंग्रज केला पुरता जर्जर। धन्य नार ती, क्षुद्र अम्ही नर ।। परि फितुरीने विनाश

केला । इंग्रज मग मोक्यावर गेला । प्रचंड पडली खिंड तटाला ।
काय करिल एकाकी बाला ।। बाला कसली ? ज्वाला उठली ।
घोड्यावरती मांड ठोकली । उडी झोकली फळी फोडली ।
वायुगतीने निघून गेली ।।

काल्पीस धावली शूरवीर ती नार ।। जी ।।
घरदार विसरुनी घोड्यावर हो स्वार ।। जी ।।
ग्वालेर जिंकुनी मग भरवी दरबार ।। जी ।।
उलटले दैव अन् ओसरला प्रतिकार ।। जी ।।

मुंदर-काशी घेउन दासी झांशीवाली निघे पुढे ।
इंग्रज आले मागावरती शर्थीने ती खूब लढे ।
घोडा अडला, घाला पडला, राणीही समरीं पडली ।
वीरश्रीची इतिश्रीच ती ग्वालेरीजवळ घडली ।। जी ।।

बाहूंत जयांच्या नाचत होती बिजली
ती रणशय्येवर सेना अपुली निजली
ती ज्योत अखेरिस मोठी होउन विझली
जरि शंभर वर्षे पुरी । जाहली तरी ।
अम्हां अंतरी । स्फूर्ति धगधगली ।। जी ।।

## लोकमान्य टिळक

डफ दिमडी वाजली कडाडुन खणण् खंजिरी थरथरली
झनन् वाजली झांज झणाणत दिवटी तेजे फुरफुरली ।। जी ।।
शाहीराची बाही स्फुरली स्मरता गाथा वीराची
ऐका ऐका वीर कहाणी लोकमान्य बळवंताची ।। जी ।।

कोकणचा प्रांत रांगडा, सह्यगिरि खडा, तिथे चिमखडा,
वीर बळवंत आला जन्मास ।
लाभला दिवा टिळक वंशास ।
उजळुनी गेला मायदेशास ।। जी ।।

पिता गंगाधर बहुगुणी, ख्यात कोकणीं, गणित व्याकरणीं,
नव्हता कुणि त्यांचा हात धरणार ।
पुत्ररत्नास होता संस्कार ।
तयाचे तेज वाढे शतवार ।। जी ।।

दिवसांमासी बाळ वाढला, झाला बळवंत
नाना विद्या नाना शास्त्रे यांनी मतिमन्त ।। जी ।।
पोपटपंची करण्यासाठी नव्हता अवतार
परदास्याची चीड तयाच्या मनात अनिवार ।। जी ।।

आगरकर थोर व्रतधारी, करारी भारी, तितुक्या माझारी,

लाभला मित्र खरा टिळकांस ।
दोघांना ध्येयाचाच हव्यास ।
राष्ट्रमुक्तीचा सारखा ध्यास ।। जी ।।

आगरकर म्हणति टिळकांना । जरा आपला समाज देखा ना ।
दुराचार माजले नाना । छळतात बालविधवांना । गुलाम केले
आयाबहिणींना । करितात अजुनि यज्ञांना । पुजतात कसे
अज्ञाना । कोण शहाणे करिल मूर्खांना ।
सुधारणा अवघ्या समाजाची करिन हा बाणा ।। जी ।।

टिळक म्हणति ऐक मैतरा । तू म्हणशि प्रकार तो खरा । सुधारु
या आपुल्या घरा । पण आधी विचार कर जरा । देश सारा झाला
घाबरा । पारतंत्र्य आधी दूर करा । वाहू दे मोकळा झरा । स्वातंत्र्य
आपुले स्मरा । देशाला जागे तर करा । शूरांना हाताशी धरा ।
फंदफितुरांना ठोकरा ।
इंग्रजी राज्य उलथाया करू या त्वरा ।। जी ।।

तरुण वीर दोघे, त्यांची झाली मते एक,
साह्य होऊ एकमेक,
होऊ ध्येयाचे पाइक,
सारे शहाणे करू लोक,
होऊ देशाचे सेवक,
कोण मदोन्मत्त गोऱ्यांची करिल चाकरी
चाकरी हो - लाथेने लोभ ठोकरी ।। जी ।।

ह्या सह्यगिरीच्या शिरीं, वीर केसरी, गर्जना करी,
'उठा रे संधि आली नामी ।
दुमदुमे महाराष्ट्र भूमी ।
उसळले तेज रोमरोमीं ।। जी ।।

सांगती टिळक धैर्यानं, करु नका सहन,
भलता अपमान,
कसे रे होता ऐसे षंढ।
रहाते कसे रक्त थंड।
गाडा अन्याय, करा बंड ।। जी ।।

इंग्रजांची वाकडी नजर, पडली वीरांवर, त्यांनी सत्वर,
तुरुंगाची हवा दावली दोघांस।
पुरता परि चुकला त्यांचा अजमास।
भय काय ठाउक असतं वाघांस ।। जी ।।

संचारे स्फूर्तिची बिजली बळवंतात ।। जी ।।
भिरभिरा फिरू लागले मायदेशात ।। जी ।।
धडधडा बोलु लागले खड्या शब्दांत ।। जी ।।
ते बोल, विजेचे लोळ, प्रांताप्रांतात ।। जी ।।
त्वेषाने तापला गोरा आतल्या आत ।। जी. ।।

तितक्यात काय प्रकार झाला। पुण्यावर प्लेगोबा आला।
सरकारी अमल कडक झाला। रँड साहेबानं कहर केला।
सोजिर सोडले छळायाला। घरादारांत केला काला। देवघरिं देव
नाही उरला। धडधडित लुटती गरिबाला। फरफरा नेति तरुण
बाला। कोण रोखिल या जुलमाला। टिळकांनी सिंहनाद केला।
सवाल त्यांनी केला सरकारला। हत्ती काय पिसाळून गेला।
रिकामा तुमचा वरचा मजला। सोसणार नाही अन्यायाला।
समजला काय भारताला।
इंग्रज आपल्या तोऱ्यात वागु लागला ।। जी ।।
शब्दांचा मार पुरणार कसा मूर्खाला ।। जी ।।

या अशा रँडशाहीत, गोरा गुर्मीत, लोक भयभीत,

चीड आली दामू चापेकरला।
रँडसाहेबाचा घडा भरला। चापेकर झाडी पिस्तुलाला।
रँडसाहेब पुरता केला ।। जी ।।

टिळकांचा नव्हता जरि हात, त्यांच्या कृत्यात, घातलं तुरुंगात,
राजद्रोह म्हणति सिद्ध झाला।
सिंह काय डरणार का त्याला।
सुटुन येताच पुन्हा हल्ला ।। जी ।।

पुनश्च हरि ओम् मंत्र गर्जतो टिळक-केसरी निर्भय तो।
क्रांतीची ती दिव्य पताका दिशादिशांतुन फडकवितो ।। जी ।।

बंगालावर घाली घाला। वंगभंग अपमान जाहला। टिळक
केसरी पुढे धावला। खबरदार सांगे गोऱ्याला। समजु नका
बंगाल एकला। भारत सारा गर्जुन उठला।
थंड हिमालय तोहि पेटला ।। जी ।।

इंग्रज म्हणे हा टिळक, क्रांतिचा जनक, पेटवी लोक,
करावी कडक सजा याला।
धडा हा शिकवु भारताला।
टिळकांवर खटला त्यांनी भरला ।। जी ।।

सहा वर्षांची सजा तुम्हांला न्यायाधिश वदला
लोकमान्य झुंजार पुरुष तो लवहि न डगमगला ।। जी ।।
राष्ट्रपुरुष तो वदे मुखातुन तेजस्वी वाणी
'खुशाल दावा कितिही वर्षे मज काळे पाणी ।। जी ।।
माझ्या हातीं घाला अवजड तुम्हि साखळदंड
दंड थोपटुन उभाच राहिल पुन्हा भरतखंड ।। जी ।।
खंड खंड उडतील इंग्रजा तुझिया राज्याचे

उज्ज्वल चित्र दिसे आम्हांला भारतवर्षाचे ।। जी ।।
मदोन्मत्त सम्राटा ! आहे जगिं दैवी शक्ती
मी निर्दोषी, निष्कलंक मी मजला सांगत ती ।। जी ।।

ब्रह्मदेशीं काळ्या पाण्यावर, धाडला नरवीर,
खरा बहादुर,
धैर्याचा कळस झाला पुरता।
मंथन तिथे केलि गीता। काढले रहस्य-नवनीता ।। जी ।।

सुटून येता आनंदाने फुलला हा देश
टिळक-मुखातुन पुन्हा प्रगटला अद्‌भुत संदेश ।। जी ।।
'स्वराज्य माझा जन्मसिद्ध अधिकार मानतो मी'
स्वातंत्र्याचा मंत्र करिल हा मुक्त मायभूमी ।। जी ।।

१९२० सालात, ऑगस्ट महिन्यात, मुंबई शहरात,
राष्ट्राचा घात पुरा झाला।
गेला हा सिंह निघुन गेला।
गडही दूर राहिलेला ।। जी ।।

भर मध्यान्ही सूर्य मावळे होय चहुदिशा अंधार
आभाळाच्या हजार नयनी लागे आसूंची धार ।। जी ।।
जनसागर तर मुकाच झाला सुतक घरोघर देशात
गांधींच्या करिं ज्योत देउनी महापुरुष निजला शांत ।। जी ।।
शांत नव्हे तो देतच आहे अजून उज्ज्वल संदेश।
जनतेच्या हृदयातच शोधा तुम्हां हवा तो परमेश ।। जी ।।

स्वातंत्र्यनायका, लोकनायका, देशसेवका,
पूज्य आम्हांस तुझे गुणगान।
बलिष्ठा कर आम्हां बलवान।

राखण्या मायभूमिचा मान ।। जी ।।

हे सप्तसिंधुंनो गा तर याची गाणी
हे महासागरा झेल तीच लाटांनी
हे सह्यपर्वता घुमव अमर ती वाणी
जय लोकमान्य बळवंत,
महामतिमंत, धन्य तो संत
वंदितो चरणी ।। जी ।।

सूडाने होता कसे अंध।
मारिता कसे भाईबंद।
धर्माचा ठेवा तरी धरबंद ।। जी ।।

फ्रांय. २५८२ २५७३५ २२।१।८४

हळुहळू शांति पसरली सर्व प्रांतांत
अचानक दंगा भडकला दिल्ली शहरात
ती आग विझविण्या तिथे महात्मा जात
करण्यास शांत लोकांस, करिति उपवास,
यश यत्नास त्यांचिया येत ।। जी ।।

सांगती नेहरू गांधी, स्पष्ट शब्दामधी, राष्ट्र हे आधी, धर्माची गोष्ट काढा मागून।
हा हिंद सर्व धर्मांचा, सर्व जातींचा, सर्व पंथांचा,
टाकति सांगून ।। जी ।।

ऐकता स्पष्ट हे शब्द, सर्व जात्यंध, रागाने धुंद,
झाले होते साऱ्या भारतवर्षात।
विचार त्यांनी केला काय चित्तांत
करू या खून दिल्ली शहरात ।। जी ।।

जानेवारीच्या वीस तारखेला। गांधिजींच्या प्रार्थनास्थला।
भलताच प्रसंग बघा झाला।
गांधिजींपासुनी दूर बॉंब उडविला ।। जी ।।

पकडले जागच्या जागी मदनलालाला ।। जी ।।
थक्क हे जाहले राष्ट्र, धक्का हृदयाला ।। जी ।।
परि पूर्ण कल्पना आली नाही नेत्याला ।। जी ।।
सरदार सांगती बंदोबस्त ठेविला ।। जी ।।
गांधिजी म्हणति हा खटाटोप का भला ।। जी ।।
लवमात्र भीति चित्तात नव्हती शूराला ।। जी ।।

कधि शस्त्र छेदिते काय सांगा आत्म्याला ।। जी ।।
कधि आग जाळिते काय सांगा आत्म्याला ।। जी ।।
कधि पाणि स्पर्शिते काय सांगा आत्म्याला ।। जी ।।
कधि वायु हरपवी काय सांगा आत्म्याला ।। जी ।।

भीती न मनी तिळमात्र, तरी काळरात्र, जवळ आली मात्र,
मदनलालाचे होते साथी ।
भडकली होती त्यांची माथी ।
टपलेले होते जिवावरती ।। जी ।।
नथुराम गोडसे खुनी, कधीपासुनी, बसलेला टपुनी,
तीस तारखेला साधला त्यानं डाव
केला भ्याडानं गांधिंवर घाव ।
जगामधे काळं देशाचं नाव ।। जी ।।

पाच वाजता सुरू प्रार्थना । उशीर झाला गांधीजींना । लोक थांबले होते नाना । औत्सुक्ये उंचाविति माना ।। तो आली तेजाची मूर्ती । झप्झप् झप्झप् पाय टाकिती । हात उचलले त्यांनी वरती । नमस्कार लोकांना करिती ।। खुनी नथू मग गर्दीमधुनी । आला आला देखा घुसुनी । पडू लागला त्यांच्या चरणीं । गांधी म्हणती 'उठा' हासुनी ।। पिस्तुल काढी तो बाहेरी । चार बार मग भरभर मारी ।
चकित जाहली जनता सारी ।
गांधी म्हणती 'राम' सत्वरी ।। हो ।।

गांधिजी झाले घायाळ, रक्तबंबाळ, त्यांस तात्काळ,
आशेने नेति लोक मग आत
प्राण परि उरला नव्हता देहात ।
जाहला चहूकडे आकांत ।। जी ।।

'नथूराम ! तू मूर्ख मूर्ख रे' - सांगू या त्याला
गांधीजी का मरुनी जातिल, भ्रम झाला तुजला ।। जी ।।
घराघरातुन, मनामनातुन जगती गांधीजी
अमर जहाले, कसे कळेना जगतीं गांधीजी ।। जी ।।

शेवटी विनंती ऐका, आवरा शोका, भोवती देखा,
नथूरामाचे भाइ असती । भारती नाग कैक वसती ।
विषारी जात आहे भलती ।। जी ।।

घ्या आण मायदेशाची, आजला साची, सेवा राष्ट्राची,
हिंदवी म्हणुन फक्त करणार ।
धर्म - जातींना नाही पुसणार ।
करू मजबूत हिंद सरकार ।। जी ।।
जात्यंध भांडवलशाहिचे, हस्तकचि साचे, मित्र कवणाचे,
शत्रु यांना वाटति किसान कामगार ।
शोषती तेच यांचे आधार ।
यांचा विश्वास कोण धरणार ।। जी ।।
जातिधर्मवर्गविरहित, राज्याप्रीत्यर्थ, अपुले जीवित,
वाहु या असा करा निर्धार । गांधिजी मनामधे स्मरणार ।
त्याला हे ध्येय जवळ दिसणार ।। जी ।।

बोलले तसे चालले, तसे वागले, म्हणुन पाउले,
वंद्य ही झाली अम्हां शतवार ।
जो चंद्रसूर्य आहेत, वारे वहातात,
तो या जगतात गांधी जगणार ।। जी ।।

चाळीस कोट हृदयांत, लावली ज्योत, अपुल्या देशात,
पारतंत्र्याचा नाश केला ।

स्वातंत्र्यलक्ष्मी भारतीं, ज्याच्या संगती, आलि संप्रती,
वीर तो गेला ।। जी ।।

या जगात नव्हता असा वीर रणधीर
या युगात नाही असा पुन्हा होणार
शाहीर अशा शूराची कीर्ती गाणार
भाई हो ! द्यावं अवधान, जिवाचे कान,
करुन हे गान, ऐका सरकार ।। जी ।।

## सरहद्द गांधी बादशहाखान

वंदा वंदा खंदा सैनिक शांतियुद्धाचा
वंदा वंदा उमदा मांत्रिक प्रेममंत्राचा
जिंदा रहे बंदा पाईक दीन दलितांचा
तो पठाणांचा अभिमान, बादशहाखान,
गावा शूरानं पवाडा शूराचा ।। जी ।।

सरहद्द प्रांत पठाणांचा पहाडी नीती
रक्ताचा बदला रक्तानं घ्यायची रीती
बालपणी हाती खेळणी पिस्तुलं घेती
मनगट घट्ट बळकट, हाती अनवट खंजिराची मूठ,
भीति नच चित्ती ।। जी ।।

अशा पठाणांच्या वंशात, हिंद देशात, सीमाप्रांतात,
उतमंझाई येथ,
अब्दुल गफारखान आले जन्मास।
ख्रिस्ताचा नवा अनुकार, खुदाई खिदमतगार,
घेई अवतार, हर्ष अनिवार बेहरमखानास ।। जी ।।

परोपरीचे खेळ खेळता बालपण गेले सरून
राम लक्ष्मण दोघां बंधुंपरी खेळति हातां धरून,

अवखळ अचपळ गफारखान जरि निघति शाळेला घरून
हिंडत हुदडत मित्र जमविती उंच पहाडांवरून
बालपणीचा काळ संपता दोघे झाले तरुण
हाड जाड धिप्पाड मूळचे अंगहि आले भरून

जरि मनात आले असते
लष्करात गेले असते
प्रत्यक्ष काळ ते ठरते

परि सेवेची घेती दीक्षा खुदास चित्तीं स्मरून ॥

देशात देव बघण्याचा निश्चय केला ॥ जी ॥
ठायी ठायी पहाडापहाडात जमविती मेळा ॥ जी ॥
राष्ट्रीय बाण्याच्या कैक काढल्या शाळा ॥ जी ॥
स्वजनांनी धर्मगुरु यांनी विरोध बहु केला ॥ जी ॥
पठाणांचे ऐक्य करण्याचा चंग बांधला ॥ जी ॥
इंग्रजांचा सीमाप्रांताला लागेना डोळा ॥ जी ॥

एकोणविसशे एकोणीस सालांत,
आपुल्या देशात, तळपली ज्योत,
काळ्या कायद्याचा केला धिक्कार।
चडफडे मनीं आंग्ल सरकार।
धरपकड केली बेदरकार ॥ जी ॥

केले कैद बादशहाखान, वृद्ध बेहरमखान, इंग्रज
सरकारनं, धाडलं तुरुंगात।
किति दिवस काढले हालात, फिरला नाही बेत,
इथुन जोसात, लढण्या सुरुवात ॥ जी ॥

वीस सालीं नागपूर काँग्रेसला आले गफारखान ॥ जी ॥

खिलाफत आंदोलन गाजविलं शूरानं ।। जी ।।
झाली तीन वर्षांची कैद केला सन्मान ।। जी ।।
किति पिचले झिजले परि शांत राहिले धीरानं ।। जी ।।

झाली सुटका संपली अटक, गाठली अटक, तोच अचानक,
दंग्याचा भडका उडला देशात ।
बादशहाखान दुःखी हृदयात ।
खुनी पठाणांस करति ते शांत ।। जी ।।

तीस सालचा आला संग्राम, संचरे जोम,
ग्राम अन् ग्राम पेटुनी उठले ।
नही रखनी जालिम सरकार, घोष झुंजार,
करुनिया वीर संगरीं पडले ।। जी ।।

कितिकांचे झाले बलिदान । रक्ताचे झाले सिंचन । स्त्रीपुरुष
बालके सान । त्या कुठुन आले अवसान । गांधींचे नाव घेऊन ।
उठतात लाख चेतुन ।
नाही झाला नाही होणार असा संग्राम ।। जी ।।

पेटला सर्व गुजराथ पेटे बंगाल ।। जी ।।
मागे नाही राहिला महाराष्ट्र कंगाल ।। जी ।।
इंग्रजांनो शक्तिची किती ऐट सांगाल ।। जी ।।
परि शांति शस्त्र परजता व्यर्थ भंगाल ।। जी ।।

इकडे ऐका पेशावरला प्रकार काय झाला
खान गफारखानाला, बांधलं हातापायाला,
नेलं पोलिसठाण्याला, तुरुंगात केलं बंदिस्त,
बंदिस्त हो, पठाणांनी धरली परि शिस्त ।। जी ।।

कैक हजारो पठाण आले, मिरवित हाती झेंडे अपुले,

लढा लढाया वीर निघाले, अंबर जयघोषे दुमदुमले,
पेशावरचे रस्ते घुमले, आले लाल डगलेवाले,
उत्साहाचे भरते आले,
गांधीजी की जय जय बोले,
उंच तिरंगी नभात डोले ॥ जी ॥

अररर अररर तोच हे कुठुन,
गोरे सोजिर आले भरभरून,
उर्मट तोंडे मनात थरथरून
सणणण गोळ्या सुटल्या सरसरून,
पठाण सेना हलेल काय तिथुन,
गफारखानाचे नाव ते स्मरून, पिस्तुल नव्हते आणलले घरून,
गोळ्या झाडल्या नेम धरधरून, गेल्या छात्या रक्तानं भरभरून,
दमले गोरे परि वार करकरून,
पठाण चालले पुढती सरसरून ॥ जी ॥

आली आली तिकडुन आली, पलटण लगबग ती गढवाली,
रांग करोनी उभी राहिली, हुकूम झाला झाडा गोळी, गढवालींनी
फैर झाडली, पठाण पुढचे पडती खाली, शांतपणे परि हसती
गाली, पुढचे पडता दुसरी टोळी, झाडा छातीवरती गोळी,
खमिसाची धांदोटी केली, चलाव गोली खेलो होली, भर ले रक्त
गुलालसे झोली, शरमुन गेले ते गढवाली, बंदुक देती फेकुन
खाली, अशी अहिंसा विजयी झाली, गफारखानांनी कमाल
केली, इंग्रज म्हणती, घटना भलती,
परवडला तो खुनी पठाण
शांतीसेना नकोच असली ॥ जी ॥

असे कैक तुरुंगवास झाले खान बंधूंना

हद्दपार केलं सरकारनं शूरवीरांना
तोडले नेते जनतेचे युक्तीने नाना
परि पठाण धीर गंभीर, म्हणति ते वीर,
तोडु जंजीर, तोडु पाशांना ।। जी ।।

सरहद्द गांधी अभिधान, दिलं प्रेमानं, त्यांना देशानं,
त्यागाला नाही त्यांच्या सीमा,
शिकविती प्रेम-शांति-धर्मा, जाणुनि सत्याग्रहमर्मा ।। जी ।।

धन्य धन्य ते कोहट बन्नू, धन्य धन्य ते मर्दाना
धन्य धन्य पेशावर देइल स्फूर्ति सदा ती मर्दांना ।। जी ।।

गांधींचे हृदय ये भरून, शौर्य हे बघुन,
आले आपण होऊन,
डोळ्यांनी बघण्या प्रांत मर्दाचा ।
एकोणीसशे अडतीस सालांत, सीमा प्रांतात,
खानांसमवेत दौरा हो त्यांचा ।। जी ।।

स्वात नदीच्या तीरावरती द्राक्षमळ्यांच्या बागात
गांधीजी सरहद्द गांधिं हे हात घालती हातात ।।
छोटे मोठे गाति धबधबे स्वतंत्रतेची स्वैर हवा
दोघांच्याही हास्यविनोदा बहार आला नवा नवा ।।

तोच येऊन ठाकला पुढा, निकराचा लढा,
वीर हो लढा, करा वा मरा हाच संदेश।
बेचाळीसचे बंड पेटले,
नेते पकडले, कुंड धडकले, धन्य हा देश ।। जी ।।

तीन वर्षांची सजा भोगुनी परतुनी आले वीर घरी
परी इंग्रजी धूर्तपणाचा जय झाला हो एकपरी ।।

हिंदू मुस्लिम वैरी ठरले गफारखानां शल्य उरीं
पुन्हा खुदाचे नाव घेउनी शीर घेति उतरून करीं ।।

गांधी सांगती बिहार प्रांतास, थांबवा दंग्यास, करिन उपवास,
तुच्छ हे आज त्यजिन मी प्राण।
सरहद्द गांधी साथीस, येति मदतीस,
सांगती जनतेस, थांबवा शिर्काण ।। जी ।।

तोच प्रकार सीमा प्रांतात, होता वेगात, जाति ते तेथ,
सांगती पठाणांना व्हायला शांत।
पठाणांत मुस्लिम, हिंदू, शीखही बंधु
प्रेमानं नांदू आपल्या प्रांतात ।। जी ।।

सांगू सारे गफारखाना एका आवाजात
तुम्ही आमच्या हृदयात, अहो अजुनी आहात,
तुम्ही खुदाई खिदमतगार
तुम्ही शूरवीर पठाण, आमचा जीव हो कुर्बान,
आम्हां वाटे अभिमान,
तुम्ही स्वातंत्र्याचे आधार ।। जी ।।

मानवी जयां स्वातंत्र्य वाटे अनमोल
ज्या कुणा त्यागधर्माचे उमजले मोल
त्या सर्व बंधुंना एक अंतिचा बोल
शांतिचा दूत तळमळे, मनीं हळहळे,
आज त्यामुळे धन्य भूगोल ।। जी ।।

## सह्याद्रिसिंह भाई कोतवाल

सह्याद्रि सिंह शोभला, वीर जो भला, जीव लोभला,
त्याचिया चरणी शाहिराचा
पुत्र जातिवंत भारताचा
मुजरा त्यास करू सन्मानाचा ।। जी ।।

धन्य धन्य भाई कोतवाल, शत्रुचा काळ, बंडाचा जाळ,
चेतला सह्य पर्वतात,
दऱ्याखोऱ्यात जंगलात,
इंग्रजाची आली काळरात ।। जी ।।

बालपणांत निर्भय मनीं। कोतवाल हिंडले वनीं ।। जी ।।
दरिदरीतुनी हिंडले। जंगलचे मार्ग धुंडले ।। जी ।।
संगती शूर सोबती। शिवराज भाई शोभती ।। जी ।।
उन पाऊस भिनले अंगीं। कोतवाल मस्त रणरंगीं ।। जी ।।
वाघाची येतां डरकाळी। कोतवाल हासती गालीं ।। जी ।।

हिंडले गाव अन् गाव, पाहिले चोरसाव, रंक आणि राव,
गरिबाचि पाहिली त्यांनी दैना।
सावकाराच्या घरी नाचे मैना।
काळजी त्यांना काही सुचू देइना ।। जी ।।

कित्येक गावांचे पाठी, स्थापली धान्य कोठी, गरिबाचे पोटीं,
सुखाचा जाऊ लागला घास।
संपला सारा त्यांचा वनवास।
दुवा ते देति कोतवालांस ।। जी ।।

कोतवाल बहुत मग शिकले, वकिल कि हो झाले,
परत मग आले,
गरिबांना सल्ला फुकट देती।
सावकाराची वर्षं भरति पुरती। भाईंवर दातओठ खाती ।। जी ।।

जगात जाती दोनच असती गरीब श्रीमंत
समानता येउ द्या, होउ द्या दैन्याचा अंत ।। जी ।।

समाजवादी पक्षामध्ये म्हणुनि भाइ जाती
शेतकऱ्यांची कातकऱ्यांची संघटना करती ।। जी ।।

शेतकरी संघ स्थापिले। गरिबांस सौख्य वाटले। सावकार मनीं
चरकले। सरकार मनीं टरकले।
बंडाचे वारे देशात वाहू लागले ।। जी ।।
१९४२ साल सुरू जाहले ।। जी ।।
गांधीजी शांत वरि परी मनीं भडकले ।। जी ।।
साहेबाला 'चले जाव' दोन शब्द बोलले ।। जी ।।
ते शब्द नव्हते प्रत्यक्ष वज्र वाटले ।। जी ।।

मुंबइची सभा संपली। पुढाऱ्यांची वाणी बोलली। इंग्रजांची
सद्दी संपली। आता आहे आपुली जुंपली ।। जी ।।

सांगती हो सेनापती। तुम्ही सारे सेनापती ।। जी ।।
सांगती एक संदेश। हा स्वतंत्र करु या देश ।। जी ।।

कोतवाल आले जो परत, तदा गर्जत, तालुका कर्जत,
आपुला स्वतंत्र मी करणार
इंग्रजाचा नायनाट करणार।
क्रांति करणार किंवा मरणार ।। जी ।।

असा घोष घोषुनी त्यांची संचरे सेना ।। जी ।।
आसपास तारेचा एक खांब गवसेना ।। जी ।।
पोस्ट ऑफिस नावाची चीज कोणी परिसेना ।। जी ।।
घाटात विजेची गाडी कुठेच घुसेना ।। जी ।।
फौजदार गल्लमिशीमधुन कुठेच हसेना ।। जी ।।
सक्तीची सैन्यभरतीहि कुठेच दिसेना ।। जी ।।
थाटात मामलेदार कुठेच बसेना ।। जी ।।
अन्न अन्न करुनिया पोर कुठेच रुसेना ।। जी ।।

कोतवाल झाले रणमस्त, साहेब झाला त्रस्त, जंगलामध्ये गस्त
घालाया गुरखे सज्ज केले।
साथिला गोरे सैन्य आले।
पोलिसी पहारे सुरू झाले ।। जी ।।

कोतवाल नव्हते परि सुस्त, सैन्यामधि शिस्त, आणुनी फस्त,
साहेबाचा दाणागोटा केला।
इंग्रज नाही तेथे उरला।
खोल त्याला पाताळात पुरला ।। जी ।।

मग मनात बांधिति घाट। बंदिस्त करा बोरघाट ।। जी ।।
रात्रिचे घेउनी बुरखे। बंदीत टाकले गुरखे ।। जी ।।
घेतली नाहि कधी नीज। साहेबाची तोडली वीज ।। जी ।।
हे कैसे झाले विपरीत। साहेब झाला भयभीत ।। जी ।।
गवनेरास फुटला घाम दिनरात सुचेना काम ।। जी ।।

इंग्रजाची एक परि युक्ति, फितुर मिळविती, पैका दाविती,
म्हणती नाही नियत हिंदुस्थानास।
भाकरिचा तुकडा दावा श्वानास।
फितुर होतील येथे हमखास ।। जी ।।

असा एक फितुर मिळविती, पैका दाविती, नादान तो किती,
भाईंचा पत्ता त्याने दिधला।
'सिद्धगड' कानीं त्यांच्या वदला।
कोण घेणार याचा बदला ।। जी ।।

हॉल साहेब खूष जाहले। साथिला सैन्य घेतले। पोलीस
बंदुकावाले। फितुरास पुढे घातले। जंगलात सर्व पातले।
भालवडीचे स्थळ देखले—

'चलो चलो' मग हुकूम झाला। 'शत्रूवरती घाला घाला।
भालवडीचा डोंगर वेढा। डोंगरराने धुंडुन काढा ।। जी ।।

लपत् छपत् मग झप्झप्झप्झप्। तुडवित राने सप्सप्सप्सप्।
सिद्धगडावर चढून आले। चित्तामध्ये खूष जाहले।। शांतपणाने
भाई निजती। प्रशांत ऐसी पहाट होती। विश्रांतीची घटका होती।
घेती शांतपणे विश्रांती।। गोमा पाटील हिरा हिराजी।
साथिदार ते होतो गाजी ।। जी ।।

हॉल साहेब झाडी पिस्तुलाला। हिराजी आडवा त्याला झाला।
छातिचा कोट त्यानं केला। गोळि परि भिडली काळजाला।
हिराजी धरणीवरती पडला। भाईंचा उजवा हात तुटला। शूराचा
धीर नाहि सुटला। घेति हातांत बंदुकीला।
गोळि परि घुसली हो मांडीला। घायाळ वीर खाली पडला।
हॉलसाहेब घेरी कोतवालां। भाईंनी जिंदा होता सोडला।

तवा पाय लावून पळ काढला। आता तो मारि घायाळाला।
युद्धनीतीचा धडा असला। गोऱ्याचा नीतिपाठ असला।
गोळि गेली भेदून मस्तकाला।
देशाचा जयजयकार केला नि प्राण सोडला ।। जी ।।

कोतवाल होते महाबळी, कानशिलात गोळी, घुसली त्यावेळी,
शूराचा एक फक्त उद्‌गार।
धन्य मी राष्ट्रासाठी मरणार।
धन्य मी लढत लढत मरणार ।। जी ।।

कोतवाल मेले रानात, मेले मानात, प्राणदानात,
अर्थ हो केवढा त्यांच्या भरला।
शाहिरा पवाडा हा स्फुरला।
घडा घ्या यात उरलासुरला ।। जी ।।

सह्याद्रि सिंह शोभला, वीर जो भला, जीव लोभला,
त्याचिया चरणी शाहिराचा
पुत्र जातिवंत भारताचा
मुजरा त्यास करू सन्मानाचा ।। जी ।।

## हेमु कलानी झिंदाबाद

हेमु कलानी झिंदाबाद धन्य हुतात्मा शूर
समीप तू हृदयाशी, जाशी जरी निघोनी दूर

दुर्बलता अज्ञान दीनता यांच्या काजळराशी
कैक दिवस साठून राहिल्या या दुर्दैवी देशीं
दाहि दिशा व्यापून राहिला दास्याचा अंधार
कोण कुणाला वाट दाखविल कोण कुणा आधार
तोच घेउनी बलिदानाचा हेमू ये संदेश
दिसेल अपुले रक्त सांडता लाली पूर्व दिशेस
चूड तनूची पेटविण्याते केली नच कुरकूर
हेमु कलानी झिंदाबाद धन्य हुतात्मा शूर

नखशिखांत रुधिराने न्हाली लाली देहावरती
शिरकमलांची मोहक माला रुळते वक्षावरती
लोहशृंखला तोडुनि त्यांचे नूपुर केले पायीं
दिशा दहा उजळीत येतसे देखा क्रांतीमाई
प्राजक्ताचे रक्तदलांचे तिच्या करीं जे फूल
तेच भाइनो भारतभूचे जाणा प्यारे मूल
अंकावर जो भारतभूच्या झोपेमध्ये चूर
हेमु कलानी झिंदाबाद धन्य हुतात्मा शूर

धन्य हिंद तू धन्य सिंध तू धन्य नदी सिंधू
ज्यावरि हेमू सिंचित अपुल्या रुधिराचे बिंदू
जा जा सिंधू पवित्र जल तव सागरात ओत
भारतकीर्ती भरे जलामधि तव ओतप्रोत
या कीर्तीच्या लहरी मिळता सागरलहरींलागी
तुफान वारा यशोगंध तो नेइल जागोजागी
दिक्कोनांतुन दिव्य यशाचे घुमतिल मग ते सूर
हेमु कलानी झिंदाबाद धन्य हुतात्मा शूर

मदोन्मत्त सत्ते तू ये गे वेगे अंगावरती
कराल दाढा विशाल जबडा दात तुझे करकरती
सूडाचा आसूड म्हणूनी नागिण घेई हाती
बुडवुन हालाहलात घाली पाशहि कंठाभवती
हाण, मार, चल तुडव, निर्दये तुझिया पायाखाली
दडपुनि टाकी पृथ्वीमाजी, दाब अम्हां पाताळी
तरी भेदुनी पृथ्वी येऊ करू तुझा मग चूर
हेमु कलानी झिंदाबाद धन्य हुतात्मा शूर

हेमु कलानी झिंदाबाद धन्य हुतात्मा शूर
समीप तू हृदयाशी, जाशी जरी निघोनी दूर

## वसंत दाते अमर जाहला

स्वातंत्र्याचा नाद घुमविला ज्याने पहाडापहाडात
वसंत दाते अमर जाहला प्राण अर्पुनी महाडात ।। जी ।।

रायगडाचा खडा पहारा पहा तिथे तो साक्षीला
जिथे वसंता लढता लढता मरुनी अमरपदा गेला

पर्वतराजी, खाड़ी, झाडी, देतिल ग्वाही अजुनी ही
अचूक तारे पडतिल वरुनी, रुधिरे भिजली जेथ मही

निर्भय मंगलमय ती मूर्ती गोळ्या झेली छातीत
कीर्तीमंदिर तिथे उभे हो जेथे पडला मातीत

कोण सांगते वसंत दाते मिळुनी गेला मातीत
वसंत दाते अमर जाहला प्राण अर्पुनी महाडात ।। जी ।।

बिरवाडीचे वीर निघाले अवघे निधड्या छातीचे
छातीचे ते वीर खरोखर होते नाना जातींचे

जातीचे ते लढवय्ये परि दुसरी त्यांना जात नसे
जात नसे त्या भाकर तोवर जोवर भारत दास असे

दास असे का राहू आपण, छे छे त्याहुन मरण बरे
याच विचारे भारुन गेले बिरवाडीचे वीर हिरे

या वीरांच्या अग्रस्थानी सजे लढाया जोमात
वसंत दाते अमर जाहला प्राण अर्पुनी महाडात ।। जी ।।

नाना त्याचे सहकारी अन् नाना मदतीचे हात
पुरोहितांचा नाना परि तो पुढे पुढारी मोर्चात

पानपतावर पतन पावता समरधुरंधर विश्वास
जसा उडाला त्या वीरांचा विजयावरला विश्वास

तसेच झाले रणात याही मरण पाहुनी दातेचे
नाना घुसले भाऊसम अन् धैर्य गळाले जनतेचे

सहा तयांच्या सहकाऱ्यांना मृत्यू आला समरात
वसंत दाते अमर जाहला प्राण अर्पुनी महाडात ।। जी ।।

असेल तेव्हा किल्ल्यावरुनी पाहत शिवराया खाली
असतिल त्याच्या नेत्रांमधुनी अश्रू ओघळले गाली

असेल तेव्हा शिवरायाने टाकियलेला निःश्वास
नसेल ढळला परि देशाच्या शौर्यावरला विश्वास

असेल तो मग मनात वदला दास्य न राहिल हे खास
भारतमाता प्रसवे अजुनी असल्या थोर सुपुत्रास

कोण सांगते वसंत दाते मिळुनी गेला मातीत
वसंत दाते अमर जाहला प्राण अर्पुनी महाडात ।। जी ।।

## स्वातंत्र्यसूर्य उगवला

नव्या युगाचा नवा पवाडा नव्या दमाने दुमदुमणार
करा बंधुनो एकमुखाने स्वातंत्र्याचा जयजयकार ॥ जी ॥

स्वातंत्र्याचे स्वागत करण्या थाप डफावर कडकडणार
चला बंधुनो एकमुखाने गर्जू या 'जयहिंद' पुकार ॥ जी ॥

आज तुणतुणे काय गुणगुणे झांज काय ही छुम्‌छुम्‌णार
झांज तुणतुणे म्हणे पुकारा स्वातंत्र्याचा जयजयकार ॥ जी ॥

स्वातंत्र्यसूर्य उगवला, अहो पूर्वेला, हिंद देशाला,
सोन्याचा दिवस आज आला।
पारतंत्र्याचा काळ गेला।
शाहिरा जोम नवा चढला ॥ जी ॥

अहो ज्यांनी हाल सोसले, फास झेलले, आनंदे मेले,
शांति आता मिळेल त्यांच्या आत्म्यास।
आनंद होईल त्यांच्या चित्तास।
पूर्णता आली त्यांच्या कार्यास ॥ जी ॥

चालला दिव्य संग्राम। मृत्युने दिला विश्राम ॥ जी ॥
स्वर्गात हुतात्मे गेले। या जगी यशाने उरले ॥ जी ॥
ऐकतील तेही आता। ही स्वातंत्र्याची वार्ता ॥ जी ॥

जासुद होउनि स्वर्गामध्ये जाइल शाहीर
स्वतंत्र झाला भारत अपुला करण्या जाहीर ।। जी ।।

जाउ या चला वेगात। इंद्राच्या दरबारात ।। जी ।।
गोळिने छिन्न जी छाती । जाउ या तयांच्या भवती ।। जी ।।
फास ज्या गळ्यांमधि पडले । जाउ या तयांभवताले ।। जी ।।

सत्तावनच्या मृत वीरांना। नाना पेशवे, तात्या टोप्यांना। शूर बहादुर लक्ष्मीबाईंना। वासुदेव बळवंत फडक्यांना। दादाभाईना, लोकमान्यांना। कर्वे-कान्हेरे-चाफेकरांना। खुदीराम अन् मदन धिंग्राना। भगतसिंग-राजगुरु-दत्तांना। मल्लाप्पा। कुरबान-सारडांना। जतींद्रदास अन् बाबू गेनूना। क्रांतिकारक अन् क्रांतिवीरांना। बेचाळीसच्या बहाद्दरांना। सहस्त्र सत्याग्रहि वीरांना। आझाद सेनेच्या लढवय्यांना। नौकादलातिल नाखवा वीरांना। चला सांगु या याच बोलांना।
'सलाम मालिक—सलाम। शाहीराचा लवुनि प्रणाम।
आपण नाही आज गुलाम।
सलाम मालिक सलाम' ।। जी ।।

पुण्याई फळाला आली, शृंखला तुटली, मायभू आपली,
त्यागानं तुमच्या मुक्त झाली।
सोन्याची संधि अम्हां आली।
अंजली तुम्हां अर्पियेली ।। जी ।।

मंगल दिवशी एकच काटा सलतो हृदयात
सुभाषबाबू जिवंत असतिल किंवा स्वर्गात ।। जी ।।
नेताजी जर आले नाहित परतुन देशास
सिंह जाउनी गड आला हे म्हणेल इतिहास ।। जी ।।

वनवासी राम तो झाला, सांगु या त्याला, शूर वीराला,
परत या, पारतंत्र्य गेले।
कार्याचे तुमच्या चीज झाले।
हिंदवी झेंडा उंच डोले ।। जी।।

'सावधान' शाहिर म्हणे लोकां, नीट जरा ऐका,
पुढील या चौका, मोलाचे बोल सांगतो चार।
सर्वांनी घ्यावा एवढा सुविचार।
विनंती हीच एक करणार ।। जी।।

२

स्वातंत्र्य आज लाभले, जहाले भले, पाहिजे राखले,
राखाया यत्न लागतिल फार।
त्यागाविण नाही हाति राहाणार।
दुबळ्याला दैव नाही मिळणार ।। जी।।

आपसांत करुनिया झगडे, देश हा बुडे, गुलामित पडे,
दुहीने सारे, नष्ट होणार,
ऐक्याचा राष्ट्रालागी आधार।
हाच इतिहास बोध देणार ।। जी।।

चटकदार मी सांगिन फटका बोल नेटका विसरु नका
हिंदू मुस्लिम शीख पारशी खटका आता करू नका।। जी ।।

विनंती ही की, आपसांत एकी, कामात नेकी असावी
आपसात भांडण, परक्याला अंगण, प्रवृत्ति असली नसावी।।
सर्वांना कपडा, भाकर तुकडा, अशीच इच्छा असावी
काळा तो बाजार, देशाचा आजार, त्याची चलती नसावी ।।

सर्वांना रक्षण, सर्वांना शिक्षण, अशी व्यवस्था असावी
घरांत येउ नका, आम्हांला शिवु नका, शिवाशिवी असली
नसावी।।

प्रेमात राहू, भाऊ भाऊ होऊ, अशीच वृत्ती असावी
एकाला भाकर, दुसऱ्याला ठोकर, कसाबकरणी नसावी ।।

घामावीण नाही कुणा दाम, सर्वांना काम, योग्य आराम,
याला स्वातंत्र्य पूर्ण म्हणतात।
राखणं आहे तुमच्या हातात।
विचार हा राहु द्यावा चित्तात ।। जी ।।

स्वातंत्र्यसूर्य उगवला, अहो पूर्वेला, हिंद देशाला,
सोन्याचा दिवस आज आला।
पारतंत्र्याचा काळ गेला।
शाहिरा जोम नवा चढला ।। जी ।।

## काश्मीरवर घाला

हिंदभूमिचे नंदनवन अतिसुंदर ते काश्मीर
तिथे हिंदचे वैऱ्यासंगे रणकंदन गंभीर
स्वातंत्र्याचे रक्षण करण्या झुंजति रणझुंजार
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ।। जी ।।

स्वातंत्र्यावर घालायाला घाला
अंधारातुनि घाव अचानक आला
तो छातीवर अपुल्या झेलायाला
हासत हासत सज्ज जाहले काश्मीरातिल वीर
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ।। १ ।।

नुकती कुठली होती तुटली भवतीची जंजीर
तो मानेवर उन्मत्तांचा ये कपटी खंजीर
जिंकुनि घेण्या स्वातंत्र्याचा किल्ला
पाकिस्तानी फौजा करिती हल्ला
गर्जुन उठले शेरापरि अबदुल्ला
चला जान कुर्बान कराया घ्या तळहाती शीर
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ।। २ ।।

पाकिस्तानी फौजा कसल्या ! क्रूर लुटारू चोर
लूट लुटोनी जाळत पोळत सुटले ते घरदार

ठार करावे किती हजारो लोक
आगीमध्ये फेकति बाळे कैक
विटंबिती ते माताभगिनि अनेक
ऐकुनि सारे संतापाने तुटते शीर नि शीर
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ।। ३ ।।

दिल्लीमध्ये वीर जवाहर भारतभूचा हीर
ऐकुनि वार्ता खवळुनि नेता गेला तो रणधीर
पाकिस्तानी डोळ्यांवरची धुंदी
उतरायाला पाठवि सेना हिंदी
जाति विमानांमधुनी स्वार शिबंदी
तोफेला मग भिडल्या तोफा समशेरिस समशीर
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ।। ४ ।।

चपळाईने चालति सेना जसे धनूतुन तीर
बिजलीपरि झळकून लकाकत व्यापिति झेलमतीर
शौर्याने किति लढती हिंदी सेना
शत्रूचि किति केली त्यांनी दैना
पळत निघाले परतुन पाकिस्ताना
काश्मीरातिल जनतेचा मग वाढत जाई धीर
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ।। ५ ।।

काश्मीरी जनतेचा नेता अबदुल्ला खंबीर
एकदिलाने त्याच्यामागे सारे रंक अमीर
हिंदू मुस्लिम सारे भेद निमाले
गनिमी सेनांमधुनी सामिल झाले
सर्व तिरंगी झेंड्याखाली आले
तोबा तोबा करुनि पळाले पाकिस्तानी पीर
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ।। ६ ।।

ब्रिगेडिअर उस्मानं आपुला सेनानायक थोर
हाय अचानक गोळा लागुनि रणांगणी तो ठार
मातृभूमिशी राखुनि पूर्ण इमान
धन्य होसि तूं वीरमणी उस्मान
तव कीर्तीने दुमदुमते अस्मान
गातिल कीर्ती झेलम-रावी गातिल गीत समीर
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ॥ ७ ॥

ऐकुनि तेथिल करुण कहाण्या येते नयनी नीर
त्यागाची परि कमाल पाहुनि उन्नत होते शीर
शेरवाणि तर मेला शेरावाणी
अक्षय त्याची राहिल वीर कहाणी
शेरवाणिच्या बलिदानाची गाणी
दिशादिशांतुनि अभिमानाने गातिल शत शाहीर
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ॥ ८ ॥

धन्यधन्य काश्मीर जाहले, अन् शेरे काश्मीर
तुमच्याऐसे वीर निपजता विजया काय उशीर
स्वातंत्र्याचे खरेखुरे तुम्हि भक्त
स्वातंत्र्यास्तव तुम्ही सांडले रक्त
तुमच्या त्यागे स्थिर हो हिंदी तक्त
नवे उदेले राष्ट्र हिंदवी झुकवित चरणी शीर
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ॥ ९ ॥

## हुतात्मा मकबूल शेरवाणी

काश्मीर शोभतो मुकुट हिंदमातेचा
मुकुटात झळकतो हिरा पृथ्विमोलाचा
मकबूल शेरवाणि तो पुत्र काश्मिरचा
तूं धन्यधन्य काश्मीर। धन्य तव वीर।
गाइ शाहीर पवाडा तुमचा ।। जी ।।

साधण्या ध्येयसाफल्य, त्याग जाज्वल्य, ज्याचिया तुल्य
नसे मज ठावा।
त्या शूर शेरवाणिच्या, वीरमरणाचा, बलिदानाचा,
पवाडा गावा ।। जी ।।

जातिधर्मवर्गनिरपेक्ष, राष्ट्र हे लक्ष्य, करण्या प्रत्यक्ष,
करित बलिदाना।
स्वातंत्र्यभक्त निःस्वार्थ, मरे देशार्थ, म्हणुनिया अर्थ,
त्याचिया कवना ।। जी ।।

हिमशुभ्र कडे चहुकडे दऱ्यातुनि तळी
त्या तळ्यातळ्यांतुनि शीतळ निर्मळ जळीं
कमळांची उमले कळी खुले पाकळी
सौंदर्यदेवता मुळी। वसे त्या स्थळीं।
प्रभा वेगळी। मातृभू-भाळीं ।। जी ।।

नवखंड पहा हिंडून, बघा धुंडून,
काश्मिराहून, रम्यता कोठे ।
काश्मिरी, सृष्टिसुंदरी, तिच्या मंदिरीं,
गिरिकंदरीं पदोपदिं भेटे ।। जी ।।

त्या रम्य काश्मिरावरी, खाटकापरी,
अचानक सुरी, चालवायाला ।
पाकिस्तान करितसे स्वारी, गिधाडापरी,
घुसले सत्वरी, घास घ्यायाला ।। जी ।।

बेबंद धुंद अफगाण, पठाणहि ठाण
मांडिती प्राण, घ्यावयासाठी ।
भयभीत जाहले लोक, करिति बहु शोक,
मारिती हाक, धाव जगजेठी ।। जी ।।

जगजेठि राहिला दूर । सैतान ठाकले क्रूर ।
करितात फस्त घरदार । नेतात लूट भरपूर ।। जी ।।
धनधान्य धुवूनी नेती । लोकांस नसे पटकूर ।। जी ।।
हिसडती हात अबलांचे । रस्त्यांत बांगडीचूर ।। जी ।।
पेटता घरोघर होळ्या । गगनात कोंदतो धूर ।। जी ।।
हिमशुभ्र काश्मिरामाजी । रक्ताचे वाहति पूर ।। जी ।।
ते नंदनवन जाऊन । जाहले मसण भेसूर ।। जी ।।

हिंदु मुसलमान वा शीख, सर्वांची राख,
कराया पाक, गुंड येतात ।
अडवील कोण हा हल्ला, शेख अबदुल्ला,
याही समयाला, होते तुरुंगात ।। जी ।।

श्रीनगर आले धोक्यात, आसमंतात,
शत्रु शिरतात,

झाले मग महाराज जागे।
नेहरुंना पत्र लिहुन सांगे।
"धावा हो धावा तुम्ही वेगे ।। जी ।।

हैदोस चालला धुल्ला, गेले बारामुल्ला,
गुंडाचा हल्ला, अचानक आला।
श्रीनगर आले धोक्यात, तीन मैलांत
शत्रु घुसतात। धावा मदतीला" ।। जी ।।

दिल्लीस कडाडे वीज, धाडिली फौज,
नव्हती हो नीज, जवाहरलाला।
आपुल्या राष्ट्ररक्षणीं, सिद्ध त्या क्षणीं,
धन्य नरमणी, खरोखर झाला ।। जी ।।

मग सैन्य चपळ आपुले, तेथ उतरले,
गुंड परतले,
शेखसाहेब सुटले याच समयास।
धीर मग आला साऱ्या लोकांस।
प्रधानकी दिली शेखसाहेबांस ।। जी ।।

ते सर्व गनीमी सैन्य, खरोखर धन्य,
त्यांत असामान्य, कथा ऐकावी।
मकबूल शेरवाणिची, शूरवीराची,
दिव्य मरणाची, कहाणी गावी ।। जी ।।

साधण्या ध्येयसाफल्य, त्याग जाज्वल्य,
ज्याचिया तुल्य, नसे मज ठावा।
त्या शूर शेरवाणिच्या, वीरमरणाचा,
बलिदानाचा पवाडा गावा ।। जी ।।

जाति-धर्म-वर्ग-निरपेक्ष, राष्ट्र हे लक्ष्य,

करण्या प्रत्यक्ष करित बलिदाना।
स्वातंत्र्यभक्त निःस्वार्थ मरे देशार्थ,
म्हणुनिया अर्थ, त्याचिया कवना ।। जी ।।

इतिहासाची पाने उलटुनि घ्या हो चाहूल।
जनाब जीना काश्मिरामधे ठेविति पाऊल ।। जी ।।

जिनासाहेब आले काश्मिरला,
हक्क बदलायला, बारामुल्लाला,
थाटली सभा त्यांनी थाटात।
व्याख्यानाला झाली होती सुरवात।
गर्जला शेरवाणी इतुक्यात ।। जी ।।

कडाडून बोलला बोल भिडले ते नभा ।। जी ।।
भाइ हो कुणी थाटली सांगा ही सभा ।। जी ।।
देशाचा द्रोह करणारा जिना हा उभा ।। जी ।।
तोडून उद्या मागेल आपुला सुभा ।। जी ।।
जिनासाहेब स्पष्ट सांगा ना तुमचा मनसुबा ।। जी ।।

ऐकून स्पष्ट हे बोल, होउनी खजिल, जिना तात्काळ,
सोडुनी गेले बारामुल्लास।
शेरवाणी प्यारा साऱ्या लोकांस।
देवापरि भजू लागले त्यास ।। जी ।।

आकाश काजळुन जात पुढिल वर्षात
खंजीर पाजळुन घुसे शत्रु देशात
बारामुल्ला पाकिस्तान्यांनी घेतलं ताब्यात
आसपास झाला हाहाःकार, जुलुम अनावर,
कोंडला शेर, पिंजऱ्या आत ।। जी ।।

वाचनालय ठाणे
२५८२
काव्य २५७३५
२२१९०१९८
शाखा (स्थळ प्रत)

शेरवाणिनं बेत काय रचला।
गनीमी कावा पाहिजे केला।
वरवर सामील त्यांना झाला।
मदत आतून हिंदभूला।
गुप्तपणे लढा लढण्याचा चंग बांधला ।। जी ।।
रात्रिचा पडता अंधार, फटफटीवर,
होइ तो स्वार, मारी चक्कर, श्रीनगर तर,
मैल सत्तर, मैल सत्तर।
म्हणे प्राण जावो वा राहो, आहे बेहेत्तर ।। जी ।।

कडाक्याची थंडी भयंकर, झोंबतंया वारं,
भरतं कापरं, धरुनि मनि धीर,
गाठि श्रीनगर, गाठि श्रीनगर।
जाऊन शेखसाहेबांस सांगे सत्वर ।। जी ।।

शेखसाहेब माहिती ऐका,
प्रसंग आहे बाका, शत्रुचा नाका,
इथे हा देखा, थोडी आहे संख्या,
साधा हा मोका, गुंडांना ठोका,
माहिती सांगे, माहिती सांगे।
सैन्यास आपुल्या विजय मिळे मग वेगे ।। जी ।।

नउ दिवस यापरी करी पुरा तो बेत
दैवानं साधला परी पुरेपुर घात
गुंडांना आला समजून सारा वृत्तांत
दहाव्या दिवशी येता परतून, पडले ते तुटुन,
त्यास पकडून, नेतिं निमिषात ।। जी ।।

नॅशनल कॉन्फरन्स त्यांची, देशभक्तांची,

खाण रत्नांची, सिद्ध लढण्याला।
स्थापून गनीमी दले, नाव राखले,
शत्रु रोखले, त्याच जागेला ।। जी ।।

शेखसाहेब माहिती ऐका,
प्रसंग आहे बाका, शत्रुचा नाका,
इथे हा देखा, थोडी आहे संख्या,
साधा हा मोका, गुंडांना ठोका,
माहिती सांगे, माहिती सांगे।
सैन्यास आपुल्या विजय मिळे मग वेगे ।। जी ।।

नउ दिवस यापरी करी पुरा तो बेत
दैवानं साधला परी पुरेपुर घात
गुंडांना आला समजून सारा वृत्तांत
दहाव्या दिवशी येता परतून, पडले ते तुटुन,
त्यास पकडून, नेति निमिषात ।। जी ।।

मी करुनि जिवाचा धडा, जरी धडधडा, पवाडा गातो।
तरि तीर माझिया हृदया भेदुनि जातो ।। जी ।।
बांधून टाकुनी हात, गुंड नेतात, शेरवाणीला।
खुंटीस हात बांधून टांगले त्याला ।। जी ।।
घ्यावया तयाचा सूड, अहो आसूड मारिले त्यांनी।
लाविल्या मशाली जळत्या त्याच्या नयनीं ।। जी ।।
'पाकिस्तान जिंदाबाद बोल, एकदा बोल' म्हणति ते त्याला।
'का व्यर्थ वेचिसी सांग तुझ्या प्राणाला' ।। जी ।।
तो तदा म्हणे 'जय हिंद', प्यारा मज हिंद, सितारा हिंद।
'जय हिंद' हाच मम छंद हाच आनंद ।। जी ।।
'जय जनाब जीना, बोल, एकदा बोल' म्हणति ते त्याला।

तो म्हणे फक्त जाणतो शेख अबदुल्ला ।। जी ।।
'कायदे आजम की जय, बोल मग अभय, देउ रे तुजला'।
तो म्हणे जवाहरलाल ठाउका मजला ।। जी ।।

मारिला कपाळीं खिळा, रक्त भळभळा, पडले धरणीला,
म्हणति मग क्रूर गुंड त्याला।
'पाकिस्तान जिंदाबाद' बोला। हवे जर प्राणदान तुजला।
तरी जय हिंद पुकार केला ।। जी ।।

चौदा गोळ्या मारल्या देहात, झाला देहान्त,
प्राणांची ज्योत, शेवटी विझली।
ती ज्योत आमुच्या मनीं, राहि तेवुनी,
हृदय उजळुनी, जशी काय बिजली ।। जी ।।

दुसऱ्या दिवशी करुनिया हल्ला, घेतलं बारामुल्ला,
शेख अबदुल्ला,
आले तत्काळ बारामुल्लास।
दृश्य हे दिसलं त्यांच्या नयनांस।
दुःखानं चटका बसला हृदयास ।। जी ।।

ते म्हणति—'मुकुट काश्मीर हिंदमातेचा
मुकुटात झळकतो हिरा पृथ्विमोलाचा
मकबूल शेरवाणि हा पुत्र काश्मिरचा
तूं धन्यधन्य काश्मीर, धन्य तव वीर।
गाति शाहीर, पवाडा तुमचा ।। जी ।।

## दारूची कहाणी

दारुची कहाणी ऐका, पराक्रम देखा, सांगा एकमेका
दारुचा सारा दिव्य इतिहास ।
औक्षाचा करते कैसा ही नाश ।
भुलविते कशी भोळ्या जीवांस ।। जी ।।

जन्मली क्षीरसागरीं, सुरा आसुरी, चौदा रत्नांपरी,
जन्मली हालाहलासंगे ।
रंगली माणकाच्या रंगे ।
संसार पुरता पुरता भंगे ।। जी ।।

विषाहुनी ही फार भयंकर, दारुण ही दारू ।
भडकवुनी ही खडकांवरती आदळते तारू ।। जी ।।
बळरामाचे, श्रीकृष्णाचे यादव सरदार
दारू पिउनी परस्परांना हाणिति तलवार ।। जी ।।
संभाजीच्या समशेरीला गनीम थरथरती ।
दारूपायी संभाजीचा वध झाला अंती ।। जी ।।

राक्षसी अशी मायावी, नादाला लावी, काळजी घ्यावी
रहा तुम्ही चार पावले दूर ।
बायकापोरांस्त्री नको हुरहूर

घरी मग निघंल सोन्याचा धूर ।। जी ।।

कधि बनून येते ताडी । संसार सुखाला काडी ।। जी ।।
कधि नाव घेतसे माडी । लगोलग चढविते माडी ।। जी ।।
कधि बनून ये बेवडा । राक्षस बने केवढा ।। जी ।।
साहेब बोले हिला व्हिस्की । गळ्याभोवती फास ही हिसकी ।। जी ।।
इंग्रजी नाव हिचे ब्रँडी । संगती आणिते रंडी ।। जी ।।
कधी जिन्, कधी रम् होई । तुडविते आपुल्या पायी ।। जी ।।

आता सांगतो शेठ सावकारां मोठ्या जमिनदारां, कारखानदारां,
वकील बॅरिस्टरां, वकील डॉक्टरां, कान जरा करा, ऐका शाहिरा,
विचार करा जरा, दारु का पितो कामगार ।
पडतो होऊन गारेगार ।
कारण या तुम्ही सावकार ।। जी ।।
भरपूर घेता तुम्हि सेवा, घेता सारा ठेवा, घेता सारा मेवा,
कचरा त्याला द्यावा, न्याय का हा देवा, हवा तर ठेवावा, हवा
तर काढावा,
दैना त्याच्या करता संसाराची । आग मग होते मस्तकाची ।
चैन मग होते कलालांची ।। जी ।।

झोकुन झाकुन रोज बाटली । थंडाई (?) देहास वाटली । पुंजी
त्याची सर्व आटली । विकी बांगडी, विकी पाटली । विकी
खाटली, विकी ताटली । कर्जास्तव धेंडेहि गाठली । व्याजावरि
व्याजेहि साठली । सावकाराने जिमीन लाटली । संसारातुन बाइल
उठली । मुलांलेकरां माया कुठली ।
नशिबे त्यांची पुरती फुटली ।। जी ।।

दारुड्याची होई अशी दैना, कळून त्याला येइना, सांगुन
समजेना, म्हणून साऱ्या सांगतो गाववाल्यांस ।

गुत्ता तुम्ही ठेऊ नका गावास । कलंकचि सर्व रंकरावांस ।। जी ।।

दारुबंदी हो दारुबंदी, गांवात होऊ द्या दारुबंदी ।। जी ।।
साम दावा, दाम दावा, दंड दावा, भेद दावा
दारु तुम्ही ठेउ नका, गावामंदी ।।
शेतकरी, कामकरी, हेलकरी, मोलकरी
नका बनू तुम्ही सारे बैल नंदी ।।
दारुबाजा, ऐक राजा, शाहिराचा बोल माझा
डोळ्यांवर नको आता ठेवु धुंदी ।।
चला सारे एक व्हा रे, वाहु द्यारे नवे वारे
आली आली सोनियाची आली संधी ।।

## गोमंतकाचा मुक्तिसंग्राम

ऐका ऐका भिडल्या हाका दहा दिशांना गगनाला
वीर अहिंसाव्रती निघाले अखेरच्या या समराला ।। जी ।।

तो कलावंत गोमंत, अजुनही हंत, पडे दास्यात।
स्वातंत्र्य आमुचे तोवर आहे व्यर्थ।। जी ।।

चालले सैन्य हे पुढे, आघाडीकडे, झडति चौघडे।
मदमस्त पोर्तुगीजांस चारण्या खडे।। जी ।।

हट जाव, दूर हट जाव, अबे हटवादी
सालाझार, कशी टिकणार तुझी ती गादी ।। जी ।।

वादळापरी सुटणार, अम्हि न हटणार, शीर कटणार,
कुणाला भीती?
तरवार बंदुका फुका फुका भयनीती ।। जी ।।

या हुकुमशहाला काय अम्ही डरणार ।। जी ।।
का जुलुमापुढती सत्याग्रह हटणार ।। जी ।।
का गांधीजींचा देश वांझ ठरणार।। जी ।।

रे उर्मट सालाझार, सागरापार, अम्ही करणार,
तुझी ही सत्ता।

हे हिमालयावरुनिया सांगतो जगता ।। जी ।।

इतिहास चार शतकांचा, तुमच्या जुलमाचा
अत्याचारांचा, आठवे पुरता ।
जसे पूर्वी कंस-रावण गेले सारेजण,
त्याच वाटेनं, जावं तुम्ही आता ।। जी ।।

चिमाजीनं वसई केली सर, जिंकलं तारापूर, मराठी आरमार,
मार देई फिरंग्यांना दर्यात ।
आंगऱ्यांचं नाव चारी खंडात ।
ऐकता धडकी भरली हृदयात ।। जी ।।

मराठ्यांचं पाहून नौदळ, चंड भुजबळ, फिरंग्यांनी पळ
काढला अन् येऊन दडले गोव्यात ।
मोगलांनी केली होती तिथं मात ।
फिरंगी वाचलेच तितुक्यात ।। जी ।।

गोमंतक नव्हता थंड, ठोकले दंड, राण्यांचे बंड
पेटले सत्तरिच्या महालात ।
किती राण्यांचा झाला जरि घात ।
तरीही राणे उभे समरात ।। जी ।।

घरादारा लावली चूड । राण्यांचा घेतला सूड ।। जी ।।
फितुरांची नव्हति त्या वाण । राण्यांचे झाले शिरकाण ।। जी ।।
राण्यांची धन्य ती कुळी । देशार्थ गेले ते बळी ।। जी ।।

तलवार घेउनी करीं, छपवुनी सुरी, गोमंतकभरी,
फिरंगी छळति अवघ्या लोकांस ।
सुखाचा घास नसे, कोणास ।
कैकांना घडला त्यात वनवास ।। जी ।।

रानडे दादाभाई गुरू। टिळक ते स्मरू। गांधी नेहरू
लाभले नेते भरतखंडास।
इंग्रजांना घालवून सदनास।
पारतंत्र्याचा, केला हो नाश ।। जी ।।

गोव्याची प्रजा जागी झाली, शेहेचाळीस साली,
नांदी जणु झाली,
प्रारंभ झाला समरनाट्यास।
लोहियांनी घेतला करि झेंडा, उभारले बंडा,
पराभव परी आला वाट्यास ।। जी ।।

ठिणगी परि पडली होती गोमांतकाआत
आग पेटलीच त्यात, वीर उठले असंख्यात, किती गेले
तुरुंगात, किती एक झाले भूमिगत।
भूमिगत हो, परि ज्योत ठेवली तेवत ।। जी ।।

नॅशनल काँग्रेस गोव्याची, माय शूरांची ।। जी ।।
सिद्धता केली सर्वांनी फिरून लढण्याची ।। जी ।।

धन्य धन्य पीटर अल्वारीस, खपती रातंदीस,
मायभूमीस, मुक्त करण्याला
संघटित युद्ध अघटित अखेर लढण्याला ।। जी ।।

पीटरांनी रचला मग बेत, मित्रांसमवेत, शिरले गोव्यात,
बांधले मोर्चे ठायी ठायी।
जमविले शूर वीर भाई।
प्राण देण्यास मुक्तिपायी ।। जी ।।

जिंकून हवेली दादरा। फिरंग्यांना दिला हादरा ।। जी ।।
आझाद गोमांतक दल। टाकती पुढचे पाउल ।। जी ।।

ऐका ऐका दहा दिशांनो, ताऱ्यांनो बोला बोला
झुंजारांनी झुंज देउनी जिंकियले तेरेखोला
अमर समर ते तेरेखोलचे घडवुन गेले साक्षात्कार
असंख्य सत्याग्रही निघाले करीत भारत जयजयकार ।। जी ।।

सुधाताई देति नवसुधा मेल्या जनतेला ।। जी ।।
सेनापती वृद्ध वीरांनी सत्याग्रह केला ।। जी ।।
झुंजार गोरे-लिमयांनी लढा पेटवला ।। जी ।।
मापारी बाळ गोव्यात हुतात्मा पहिला ।। जी ।।

देशभर झाला हाहाःकार, होता गोळीबार, सत्याग्रहींवर,
अमीचंद ठार झाले समरात।
नित्यानंद सहा आणि थोरात।
देति बलिदान मुक्तियज्ञात ।। जी ।।

ते धन्य धन्य बलिदान, तेच आव्हान भारतालागी।
खडबडून झाली जनता अवघी जागी ।। जी ।।

धर्मपंथ मतभेद निमाले पक्षहि मावळले
जेधे, जोशी, टिळक नि चितळे सर्व एक झाले ।। जी ।।

१५ ऑगस्ट पंचावन, सुमंगल दिन, दहा दिशांतुन,
निघाले वीर मुक्तिसमरास।
ध्येयपूर्तीचा एक त्यां ध्यास।
घडविला त्यांनी नवा इतिहास ।। जी ।।

ध्वज घेउनि अपुल्या हाती। निःशस्त्र वीर ते जाती
कष्टांची नव्हती गणती। नव्हति त्या भुकेची खंती
निर्धार एक तो चित्ती। गोव्यास मिळावी मुक्ती।।
वाहु द्या भरारा वारा। कोसळोत पाउसधारा।

समरात।    भारतालागी।
रात्रिला मिळो न निवारा।
शूरांची त्यांची रीती शिवली न कुणाला भीती ।। जी ।।

घेतले सतीचे वाण। घेतले निशाणा हाती ।।
उत्साह अदम्य उरात। कंठात मुक्तिची गीती ।।
आनंद हाच की अमुचे। देशार्थ देह हे पडती ।।
ही छाती आहे उघडी।
छातीत धडाडी निधडी।
चल गोऱ्या बंदुक झाडी।
रक्ताने अमुच्या भिजता। ही पवित्र होइल माती ।। जी ।।

लढा लढाया वीर निघाले। हजार सैनिक संगति आले। स्त्रिया मिळाल्या पुरुष मिळाले। मोर्चामध्ये सामिल झाले ।। गोमंतकच्या चहु बाजूंनी। चक्रांकित ध्वज करि घेवोनी। गात गात मुक्तीची गाणी। वीर चालले पुढे धावुनी ।। अरRर अरRर तोच हे कुठून। गोरे सोजिर आले भरभरून। उर्मट तोंडे मनात थरथरून। मारिति गोळ्या नेम धरधरून ।। पहा पहा हो सहोदरा ती। नाचवीत ध्वज अपुल्या हाती।
चुंबुन या देशाची माती। होय अग्निची धार वाहती ।। सुटली गोळी, घुसली देहीं। तरि गर्जे 'जय जय भारत' ही। धन्य धन्य ही भारतमाई। जिथे निपजली सहोदरा ही।। जय स्वतंत्रता जय जय भारत। जाती वीरमणी ललकारत। पोर्तुगीज-जुलमा धिक्कारत। सहोदरा धैर्याची मूरत ।। जी ।।

कर्नालसिंग ते निर्धाराने लढले ।। जी ।।
ते हिरवे गुरुजी लढता लढता पडले ।। जी ।।
हे सर्व हुतात्मे अमर खरोखर ठरले ।। जी ।।

भारतात दुसरे महाभारतचि घडले ।। जी ।।

ऐका हो ऐका भारतवासी सारे
नवखंड पृथ्विचे रहिवासी ऐका रे
हे साक्ष अम्हांला चंद्र, सूर्य अन् तारे
बलिदान सार्थ होईल, दास्य जाईल,
कीर्ति गातील सागरी वारे।। जी ।।

## संयुक्त महाराष्ट्र

ही मराठभूमी धन्य, अशी नाही अन्य,
देउन धनधान्य, वाढवी अम्हां काळी आई।
आधी वंदन तिच्या पायीं, शाहीर तिची कीर्त गाई।। जी ।।

हा दगड फुलांचा मर्द मराठा देश
कणिकोंडा खावया अंगि फाटका वेष
परि नसानसांतुन संचरतो आवेश
स्वातंत्र्यदेविचे भक्त, उसळते रक्त,
इमानी सक्त साक्ष परमेश ।। जी ।।

त्यागाची भूमि ही जाणा, शिवाजी राणा, मराठी बाणा,
मराठी मायबोली ओठी।
जेवतो अम्ही हिच्या ताटीं।
पुत्र गा साडेतीन कोटी ।। जी ।।

परिमळामाजी कस्तुरी। फूलांत फूल मोगरी ।। जी ।।
खणखणित खडी वैखरी। ही मराठी भाषा खरी ।। जी ।।

ये मराठीचिये घरी... विद्येचा सुकाळू करी... ती अद्भुत
ज्ञानेश्वरी... याइथेच नाथाघरी, हो नाथाघरी।
श्रीखंड्या झाला श्रीहरी ।। जी ।।

तुकयाची भावपंढरी। मयूराची आर्या सुंदरी।
इथे वामनाची चातुरी।
इथे कडेकपारीमधुन घुमली शाहिरी ।। जी।।

भाषा जहाल चिपळुणकरी। केशवसुत देति ललकारी। गर्जती टिळक केसरी। जोतिबा जळती अंतरी। आगरकर थोर व्रतधारी। राजवाडे महर्षीपरी। हरिभाऊंची कादंबरी। देवलांची कोणाला सरी। पुढे कोल्हटकर गडकरी। पठ्ठे बापूराव फडकरी। शाहीर लहरी हैदरी। कविकृष्ण नाट्यसंसारी। बालकवी निर्झरापरी। समतोल वामन मल्हारी। ज्ञानकोश केवढी बहादुरी। स्मृतिचित्रे लक्ष्मीची खरी। गाति बहिणाबाई चौधरी। केळकर नर्मचातुरी। मामांची मोठी कामगिरी। माडखोलकर भाषामाधुरी। फडक्यांचा डौल नागरी। खांडेकर खडीसाखरी। अत्र्यांच्या सरीवर सरी। सानेगुरुजी भावनिर्झरी। तांब्यांची गोड लयकारी। विनाबांची सूत्रे खरोखरी।

या मराठीच्या मंदिरी, आसनावरी, थोर किति तरी,
शारदापुत्र कीर्तिवंत।
कवी कथाकार कलावंत।
किती शाहीर किती संत ।। जी।।

हे बोल मराठी खेळति ज्यांच्या ओठीं
ते सर्व मराठे अम्ही साडेतीन कोटी
ऐक्याची शपथ घेउ या काय मग खोटी
जाऊन कधी काळिंचे, दैन्य भाळिंचे,
दीस सोन्याचे, भविष्यापोटी ।। जी।।

राज्य मराठी नागपुराहून गोव्यापर्यंत

पैठण तिकडे इकडे पसरे दर्या अपरान्त ।। जी ।।
तापी वरदा वाहति झुळझुळ तशी वैनगंगा
कृष्णा, गोदा, भीमा आणिति जीवन रसरंगा ।। जी ।।

सखा सोबती पश्चिम सागर । तीरावर कोकणचे आगर । मुंबापुरिची संस्कृति नागर । सह्याद्रीचे दुर्गम डोंगर । बागांतून फळांचे लोंगर । देशावर कष्टाळू नांगर । दाहि दिशांत विठूचा जागर...

'ग्यानबा तुकाराम, ग्यानबा, तुकाराम' स्मरा जरा घोष,
संगे 'हरहर महादेव'चा स्मरतो आवेश ।। जी ।।

अजिंठ्याची कला काय खुले । नागपुरात वैभव झुले ।
कोकणची फळे अन फुले । मुंबयला बघुन मन भुले ।
'जय महाराष्ट्र' गर्जती मातिची मुले ।। जी ।।

आम्ही नेक मराठे हिंदभूमिचे पुत्र
आम्ही सर्व मानतो एकच हिंदी छत्र
आमुचे आम्हांला घर राहू दे मात्र
ही एक आमुची आस, एक हा ध्यास,
याच घोषास करू सर्वत्र ।। जी ।।

नका भिऊ शेजाऱ्यांनो मन हे विशाल, तुम्ही राहावे खुशाल, नाही लागायची मशाल, कधि तुमच्या घरादाराला । हे वचन देतो तुम्हांला । न्यायाची चाड आम्हांला । पण येऊन आमच्या सदनाला । शिरजोर कधी कोण झाला।
गय नाही व्हायची, ते ठाऊक नाही रक्ताला ।। जी ।।

सह्याद्रीचे पिउनी वारे कृष्णेचे पाणी
वीर मराठे स्वातंत्र्याची गाती जयगाणी ।। ज़ी ।।
देशासाठी पूर्वी लढले आजहि लढतील

इतिहासाची पुढली पाने इथेच घडतील ॥ जी ॥

मराठ्यांची परंपरा तेजस्वी जाणा, त्यांचा त्यागाचा बाणा,नाही भ्याले मरणा, जरा मनात आणा, शिवराय बाजी तानाजी। ते धनाजी नि संताजी। पेशवाहि पहिला बाजी। अभिमन्युपरी जनकोजी। राघो भरारी नि महादाजी।
महादाजी हो गोखला बापू रणगाजी ॥ जी ॥

इंग्रजांची आली तेव्हा सत्ता, लुटली मालमत्ता,
बसली जेव्हा लत्ता,
मराठा खडबडून उठला। बंडाचा झंझावात सुटला।
ऐका इतिहास सांगतो पुढला ॥ जी ॥

सत्तावन सालचे बंड, पेटले चंड, राहु काय थंड,
मराठे दंड, ठोकुनी प्राण देति समरात।
मर्दानी झाशीवालीही त्यांत।
सायबानं हाय खाल्ली चित्तात ॥ जी ॥

तो प्राण पाखडी वासुदेव बळवंत।
चाफेकर फासावर गेले झाले यशवंत।
सहा वर्षं सजा टिळकांना ब्रह्मदेशात।
सावरकर जन्मठेपेत अदंमानात।
मुळशिला सेनापति खड्ग घेति हातांत।
बाबू गेनू शूर वीराची मरणावर मात।
शिरोड्याला रंगले मीठ मर्द रक्तात।
तळपले भोसले आझाद हिंद फौजेत।
परमवीर चक्र राण्यांना पहिले देशात।
तो भरतभूमिचा पुत्र विनोबा संत ॥ जी ॥

कुणी राज्यकुशल अग्रणी, लढति कुणि रणीं,
संतही कुणी,
शक्तियुक्तिचे ऐक्य घडले । त्यागाचे झेंडे फडफडले ।
स्वप्न आता खरे करू पुढले ।। जी ।।

ग्यानबाचे भकाळी पोट भरेल उद्याला
त्याच्या मायभाषेचा जरा आधार द्या त्याला
शिक्षण मायबोलीत खेड्यापाड्याला
राज्याचा कारभार सहज समजुं द्या त्याला ।। जी ।।

दबदबा कोर्टकचेरीचा, खोट्या वकिलीचा, परक्या भाषेचा,
आम्ही नष्ट आता करणार ।
मराठी एक राज्य होणार ।
करा ऐक्याचा जयजयकार ।। जी ।।

या हो सान थोर कुलवंत, कवी कलावंत, संसारी वा संत,
जय जय महाराष्ट्र बोला । बोला एकस्वरीं बोला ।
जयजयकार भिडु द्या गगनाला ।। जी ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५८२
२५७३५
कायम क्र.
२२।७।०५८
ग्रंथ शाखा

REFBK-0025735
REFBK-0025735

## शाहीरांना मानाने वागवा

या शाहीरांना मानाने सारे वागवा

तुणतुणे कशास्तव गाई-गुणगुणुन्
वाजती डफावर थापा-कडकडुन
रुणझुणति खंजिऱ्या झांजा - का म्हणून
ही वाद्ये सारी सांगती लोकां जागवा

नर्तिका नाचता नाणी-वाजती
गायिका हजारो रुपये-मागती
चैनीत किती खैराती-चालती
परि कवडी दमडी यांचीही आम्हा वानवा

तोडती पाश प्रेमाचे-शाहिर
घरदार सोडुनी पडती- बाहिर
चाहूल क्रांतिची करण्या- जाहिर
रे माया त्यांना मातेची कोणी दाखवा

रसरंगि रंगता होई-रंजन
रसरंग नव्हे परि अवघे- जीवन
चेतना स्फुरो ऐकता - गायन
या शाहीरांच्या मोलाच्या बोलां आठवा

चाळीस कोट हृदयांत, लावली ज्योत, अपुल्या देशात,
पारतंत्र्याचा नाश केला ।
स्वातंत्र्यलक्ष्मी भारतीं, ज्याच्या संगती, आलि संप्रती,
वीर तो गेला ।। जी ।।

प्रत्यक्ष प्राण भारता, जगाचा नेता, देव तो दलितां,
'महात्मा' सार्थ केले ज्याने नाव ।
जो मायबापांहुनि वंद्य, त्याच्यावर निंद्य,
दुष्ट जात्यंध घालती घाव ।। जी ।।

